श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑगस्ट २०२४ | वर्ष – १२ अंक – ८ अ | विशेषांक, पाने १६ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९४ वी जयंती साजरी



सोमवार, दि. २९ जुलै २०२४ रोजी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९४वी जयंती प्रतिवर्षाप्रमाणे बहुउद्देशीय सभागृह श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट येथे साजरी झाली. या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ व संस्कृत कोश प्रकल्प प्रमुख प्रा. डॉ. प्रसाद प्रकाश जोशी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव, क्रीडा संचालक श्री. श्रीकांत पराडकर, फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर आदी मान्यवर या कार्यक्रमाला सभामंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख वक्ते आणि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन सादर केले. शिक्षिका सौ. अश्विनी खांडेकर यांनी सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक केले तर सौ. आरती जाधव यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली.

याप्रसंगी शाळा तसेच विविध शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांनी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकरसाहेबांच्या स्फूर्तिप्रद जीवनाविषयी बोलून त्यांना आदरांजली वाहिली.

श्रेया पाटेकर या बी.एस्सी. नर्सिंगच्या तृतीय वर्षात



*प्रा. डॉ. प्रसाद प्रकाश जोशी यांचे स्वागत करताना वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील*

शिकणाऱ्या विद्यार्थिनीने आपल्या मनोगतामध्ये ग्रामीण भागातील जनतेच्या रोगनिदानासाठी सर्व सोयींनी सुसज्ज असणारे रुग्णालय त्याचबरोबर या संस्थेमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध वैद्यकीय शैक्षणिक सुविधांची माहिती सांगून या संस्थेची विद्यार्थिनी असण्याचा अभिमान वाटतो असे नमूद केले.

समीक्षा लिंगायत या जीएनएमच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीने साधी राहणी उच्च विचारसरणी असे ध्येय बाळगणाऱ्या वालावलकरसाहेबांविषयी आपले मत व्यक्त करून रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये चालणाऱ्या संस्थेच्या कार्याविषयी तसेच सेवेविषयी माहिती सांगितली.

यशदा म्हात्रे या फिजिओथेरपीच्या तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीने साहेबांचे पूर्वायुष्य, दिगंबरदास महाराज यांच्या भेटीने साहेबांच्या जीवनाला मिळालेली कलाटणी आणि त्यानंतर साहेबांनी केलेले सामाजिक कार्य हे सांगत साहेबांच्या जीवनातील विविध पैलू उलगडून सांगितले.

तन्वी खेडेकर या फिजिओथेरपीच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीने ऐहिक सुखाच्या मागे न लागता जे काही आहे ते सर्व सद्गुरूंचेच आहे अशी साहेबांची भावना सद्गुरूंना भेटल्यापासून कायमचीच होती हे सांगत साहेब आणि त्यांच्या परिवाराने सद्गुरुवचनाचे केलेले पालन सोदाहरण सांगितले.

### *डॉ. प्रसाद प्रकाश जोशी : परिचय*

*डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ येथे प्र-कुलगुरू व संस्कृत कोश प्रकल्प प्रमुख. पूर्वी काही काळ फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये संस्कृत प्राध्यापक व विभाग प्रमुख. संस्कृत विषयामध्ये एम. ए. पीएच. डी. तसेच English व Linguistics विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी. जर्मन भाषेचे शिक्षणही त्यांनी पुणे विद्यापीठातून घेतले आहे. भारतातील लोक, संस्कृती, भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास विषय Indology मध्येही त्यांनी पदविका संपादन केली आहे. संस्कृत वरील चार पुस्तके व प्राकृत साहित्यावरील एक पुस्तक अशी पाच पुस्तके प्रकाशित आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूण २६ शोधनिबंध प्रकाशित तसेच परिषदांमध्ये संस्कृत वरील Presentations, मराठी व संस्कृत भाषेतून अनेक लेख प्रसिद्ध. निमंत्रित व्याख्याते, संस्कृत अभ्यास मंडळाचे सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पडल्या आहेत. लहानपणापासून त्यांनी संघ स्वयंसेवक म्हणून कर्तव्य बजावले आहे. सध्या संस्कृत भारती पश्चिम मध्य क्षेत्र अध्यक्ष असे दायित्व आहे. उत्कृष्ट पी.एचडी. प्रबंधाकरिता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा बाबासाहेब तावडे पुरस्कार तसेच तसेच अन्य अनेक पारितोषिके.*

गायत्री जागुष्टे या इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीने इंग्रजी भाषेतून वालावलकरसाहेबांच्या जीवनातील प्रसंग सांगून साहेबांमध्ये असणारी विविध गुणवैशिष्ट्ये सर्वांसमोर मांडली. तर अंतरा वैद्य या नववीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीने संस्कृत भाषेतून साहेबांच्या जीवनातील प्रसंग सांगून साहेबांची अभ्यासूवृती, दानशूरपणा आणि चिकाटी या सद्गुणांना अधोरेखित केले.

जर्मन भाषेतून रुद्र अय्यर आणि राधा पाटणकर या विद्यार्थ्यांनी शाळेत नवीन सुरू करण्यात आलेल्या कोडिंग या विषयासंबंधी तर स्पॅनिश भाषेतून अनुष्का सकपाळ आणि ईश्वरी



*श्रेया पाटकर*



*शमिका लिंगायत*



*यशदा म्हात्रे*



*तन्वी खेडेकर*



*गायत्री जागुष्टे*



*अंतरा वैद्य*



*ऋद्र अय्यर आणि राधा पाटणकर (जर्मन)*

सुर्वे या विद्यार्थिनींनी 'ऑगमेंटेड रिऍलिटी'विषयी माहिती सांगून त्यातून मिळणारी कौशल्ये, भविष्यकालीन उपयोग सांगितले व शाळेत मिळणाऱ्या अद्ययावत शिक्षणाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात आदरणीय प्रा. डॉ. प्रसाद जोशी यांनी हिंदू धर्म तसेच भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये, साधू संतांचे विचार, रामायण, महाभारत, भागवत, तसेच जातक कथात आलेल्या अनेक दानशूर व्यक्तींच्या कथा सांगून आधुनिक काळातही दिसून येणारे साहेबांचे औदार्य, विनम्रता, गुरुभक्ती, एकनिष्ठा हे गुण उलगडले. डेरवणसारख्या गावामध्ये काम करत असताना दातृत्वाचा आदर्श वालावलकरसाहेबांनी आपल्यासमोर ठेवला हे मला संस्थेचा परिसर गेले दोन दिवस पाहत असताना जाणवले. हे सर्व करत असताना मी कोणी मोठा आहे ही भावना त्यांच्यात अजिबात नव्हती. इथे जे काही उभे राहिले आहे, जो कल्पवृक्ष उभा राहिला आहे, तो या सर्व सेवाकार्याचा साक्षीदारच आहे. इथे आरोग्याच्या ज्या समस्या आहेत, त्या कुपोषणाशी व अंधश्रद्धेशी जोडलेल्या आहेत. त्या जर नष्ट करायच्या असतील, तर रोगाबरोबरच सामाजिक समस्यांचेही निदान करायचे काम इथली आरोग्य सेवा करते. त्याचबरोबर डेरवणसारख्या ग्रामीण भागात अत्यंत सुसज्ज अशी शाळा उपलब्ध करून, तेथे कौशल्यावर आधारित उपक्रम, तसेच अंतरिक्ष ज्ञानाची माहिती सांगणाऱ्या सुसज्ज प्रयोगशाळा उभारून त्यांनी शिक्षण क्षेत्रातही उत्तम कार्य केले आहे. इथे असणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरराष्ट्रीय करार, संस्थेमार्फत घेण्यात येणारे विविध उपक्रम पाहून आपण भारावून गेल्याचे त्यांनी आपल्या मनोगतामध्ये आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमाला संस्थेतील पदाधिकारी, कर्मचारी, डॉक्टर्स, नर्सेस, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली



*ईश्वरी सुर्वे आणि अनुष्का सकपाळ (स्पॅनिश)*




*न्युक्लिअर मेडिसिन सेंटरमध्ये – उजवीकडून डॉ. नेताजी पाटील, श्री. पुष्कराज मुणगेकर, डॉ. प्रकाश जोशी, डॉ. सुवर्णा पाटील आणि अन्य*



*डॉ. प्रकाश जोशी आपले विचार व्यक्त करताना*

# डेरवण येथे इंग्रजी माध्यम प्रशालेत लो. टिळक पुण्यतिथीचे आयोजन




का जावे आम्ही आज कुण्या राऊळी । तव चरित्र आम्हा मंगल देवस्थान ।।

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये गुरुवार, दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी लो. टिळक पुण्यतिथी आयोजित करण्यात आली होती. सभेसाठी ज्येष्ठ उद्योजक, वास्तुसल्लागार आणि व्याख्याते श्री. राजेंद्र गजानन वालेकर यांना सन्माननीय वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. लो. टिळक आणि स्वा. सावरकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहिल्यानंतर सभेला प्रारंभ झाला. दीप प्रज्वलन आणि सभामंचावरील लो. टिळक आणि श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून सन्माननीय वक्त्यांनी आसन ग्रहण केल्यावर सूत्रसंचालक श्री. ओमकार तांबे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केल्यावर श्री. यश कापडी यांनी त्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रशालेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी त्यांचा शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि सन्माननीय वक्त्यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली.

लोकमान्य टिळकांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखवताना आपल्या व्याख्यानात श्री. वालेकर म्हणाले, "...काल सकाळी ह्या ठिकाणी मी आलो आणि आजपर्यंत संपूर्ण परिसर पाहून झाला समाधिमंदिरात जाऊन आलो आणि गुरुशिष्याचं एकमेकांमधलं असलेलं नातं, प्रेम किंवा द्वैत-अद्वैत ज्याला आपण म्हणतो; आणि गुरूने सांगावे, शिष्यानं ते करावे अशा प्रकारचं संपूर्ण परिसरातलं कर्तृत्व पाहिल्यानंतर मलाही असं वाटायला लागलंय की सगळं सोडून इथेच येऊन राहावं की काय? "देवानांच ऋषीनांच गुरुं कांचन सन्निभम् बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम् ।।" महर्षी वेद व्यासांनी नवग्रहांची वर्णनं केलेली आहेत श्लोकांमध्ये हा गुरूंचा श्लोक आहे. मी आता शाळेत पाहत होतो त्या वेळी तिथे अंतरिक्षाची सफर करून आलो आणि तिथे एका टॅबमध्ये मला ग्रहांचं कोड स्कॅन केल्यानंतर तो प्रत्यक्ष ग्रहांचा रंग, ग्रह असा तो प्रत्यक्ष दिसला. मी गुरू पण पाहिला आणि शनी पण पाहिला, तेव्हा असं लक्षात आलं की महर्षी व्यासांनी जे गुरूंचे वर्णन केले आहे साधारण आजपासून विचार केला तर साडेपाच हजार वर्षांच्यापूर्वी ते केलेलं आहे. म्हणजे यंदाचे युगाब्ध आहे हे ५१२६ आणि हे युगाब्ध सुरू झालंय ते जेव्हा युधिष्ठिरानं महाभारताचे युद्ध जिंकलं आणि सिंहासनावर बसला त्या वर्षापासून. त्याला यंदाच्या वर्षी ५१२६ वर्षे झाली. महाभारतात व्यासांनी असा उल्लेख केलेला आहे की युद्ध झालं त्या वेळी भगवान श्रीकृष्ण ८९ वर्षांचे होते. धर्मराज युधिष्ठिर ९१ वर्षांचा होता आणि अर्जुन ८६ वर्षांचा होता. त्याच्यामुळे त्याच्या आधी त्यांचे जन्म झालेत म्हणजे ५१२६ + ९१ आणि त्याच्या आधी व्यासांनी सगळं लिहिलेलं आहे आणि त्या व्यासांनी गुरू ग्रहाचे वर्णन केलेलं आहे. म्हणजे भारताचं प्राचीन शास्त्र हे विज्ञानावर आधारित होतंच. कारण आज नासा असेल, इस्रो असेल किंवा इतर अनेक देश अंतराळात याने पाठवतात आणि वेगवेगळ्या ग्रहांची छायाचित्रं घेतात. त्यामध्ये त्यांचं जे वर्णन येतं, त्यांचा जो रंग दाखवलेलाय त्या ग्रहांचे स्वतःचे मूलतत्त्व सांगितलेलं आहे, ते व्यासांनी दोन ओळींच्या श्लोकामध्ये प्रत्येक ग्रहाचं वर्णन केलेलं आहे आणि त्यातला हा गुरूचा श्लोक आहे. 'देवानांच ऋषीनांच गुरुं कांचन सन्निभम्' सुवर्णासारखा पिवळसर दिसणारा गुरू हे व्यासांना त्या वेळी कुठली दुर्बीण उपलब्ध होती माहीत नाही पण त्यांना तो दृष्टीला पडलेला होता आणि त्याचं वर्णन त्यांनी केलेलं होतं. त्याच्यामुळे अशा या व्यासांची आपण व्यासपौर्णिमा

- गुरुपौर्णिमा साजरी करतो. त्याच्यामुळे गुरुशिष्यांच्या या पवित्र पुण्यभूमीमध्ये आल्यानंतर मला व्यासांच्या गुरुपरंपरेची आठवण झाली आणि हा गुरूवरचा श्लोक मुद्दामहून तुमच्यासमोर सादर केला.

तुम्ही म्हणाल अहो लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीबद्दल आपण बोलायला आलो आहोत आणि हे काय सांगता महाभारत? याच महाभारतात गीता पण आहे आणि या गीतेवरती लोकमान्यांनी चांगले भाष्य केले, टीका केली. आजच्या भाषेतील टीका नाही. गीतेवरती भाष्य करणारे जे काही सहा लोक आहेत त्यांच्यामध्ये संत ज्ञानेश्वर, मध्वाचार्य तसेच या सहा भाष्यकारांपैकी एक लोकमान्य टिळक आहेत. 'गीतारहस्य' हा ग्रंथ त्यांनी सहा वर्षीच्या कालखंडामध्ये मंडालेच्या तुरुंगात असताना लिहिला. लोकमान्यांच्या पुण्यतिथीला आज १०४ वर्षे झाली. १९२० साली लोकमान्यांचे देहावसान झाले. टिळकांचा जन्म १८५६ला झाला आणि त्यांच्या लहानपणीचा भाग शाळेमध्ये आपण शिकलेलो असतो. 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत, मी टरफले उचलणार नाही.' आणि नंतर आपल्याला टिळक समजतात ते 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच' शाळेमध्ये या दोन वाक्यातच टिळक संपतात. पण टिळकांच्या आयुष्याचा जर विचार केला तर एकूण ६४ वर्षांचं आयुष्य ते जगले आणि ६४ पैकी ४० वर्षे ही त्यांच्या कर्तृत्वाची आहेत - १८८० ते १९२०. आणि ह्या ४० वर्षांच्या आयुष्यामध्ये एक माणूस; ज्या सत्तेच्या साम्राज्याचा सूर्य कधीही मावळणार नाही असं म्हटलं जायचं, त्या सत्तेला खुलं आव्हान देऊ शकतो इतकंच नाही तर एकटा आव्हान न देता लोकजागृती करू शकतो आणि संपूर्ण समाजामध्ये अशा प्रकारचं वातावरण तयार करू शकतो की इंग्रजांनी आता गेलंच पाहिजे.

पत्रिकेमध्ये लग्न बघताना मुलगा आणि मुलीचे ३६ गुण जमतात की नाही असे बघितले जाते. टिळकांच्या स्वतःमध्ये जवळजवळ ३६ पेक्षा जास्त वेगळे वेगळे गुण आहेत. म्हणजे आजच्या काळामध्ये एक व्यक्ती एक गुण घेऊन आपले संपूर्ण आयुष्य कर्तृत्वाने सिद्ध करू शकतो, अशी परिस्थिती आहे. कारण डाव्या हाताच्या अंगठ्याच्या नखाचा स्पेशलिस्ट डॉक्टर आहे, डाव्या-उजव्या गुडघ्याच्या पाठीमागच्या एखाद्या लिगामेंटच्या तुकड्याचा स्पेशलिस्ट डॉक्टर आहे. खालची दाढ, वरची दाढ अशा प्रत्येक अवयवाचा स्पेशालिस्ट डॉक्टर आहे. एका व्यक्तीमध्ये एवढे गुण असलेला हा माणूस त्याचे रसायन तर कसं असेल? मला महाभारताचा अभ्यास करत असताना असं लक्षात आलं की देवकीच्या पोटीच श्रीकृष्ण कसा काय जन्माला आला? काहीतरी कारण असलं पाहिजे. भगवान अवतार घेतात त्या वेळी बाईची कुससुद्धा तपासून घेतात, कुणाच्याही पोटी अवतार जन्माला येत नाही. त्याच्यामुळे रामाची कौसल्या आणि कृष्णाची देवकी. त्यांच्या पोटीच हे अवतार जन्माला आले किंवा तुकाराममहाराज




*श्री. राजेंद्र वालेकर यांचे स्वागत करताना सौ. शरयू यशवंतराव*

त्यांच्या आईच्या पोटी जन्माला आलेले. आज साडेतीनशे ते चारशे वर्ष झाली तरी आज आपण त्यांची आठवण ठेवतो, स्मरण करतो. पाच-पाच हजार वर्षे झाली तरी कृष्णाची आठवण ठेवतो. त्याच्याही आधी रामायण झालं ते किती वर्ष झालं. तर व्यासांनीच असं लिहिलं की महाभारत युद्धामध्ये रामाचा विसावा वंशज कौरवांच्या बाजूने पांडवांच्या विरोधात लढला आणि व्यासांनी मूळ महाभारत लिहिलं आणि मी आता वयं सांगितली लढतानाची योध्यांची. या सर्वांचं वर्णन तरुण योद्धे असं केलेलं आहे. तो लढताना त्यांच वय ८५, ८६, ९०, ९१, ९२ आणि पितामह भीष्म जवळजवळ १२० अधिक वर्षांचे आहेत.

युद्ध झालं त्या वेळी म्हणजे लढतानाची तरुण योद्ध्यांची सरासरी वयं जर काढली तर शंभर वर्षांपेक्षा जास्त आयुष्य हे प्रत्येकाचं आहे त्याच्यामुळे रामाचा जर विसावा वंशज काढला तर राम हा त्याच्या आधी दोन हजार वर्ष होऊन गेला असं म्हणायला हरकत नाही. तंत्रशुद्ध, कारण आपण टिळकांच्याबद्दल बोलणार आहोत. त्यामुळे गणित आकडेवारी याच्यामध्ये चूक होण्याची शक्यताच नाही आणि दोन हजार वर्षांआधी जर राम झाला असेल तर सात हजार वर्ष झाली तरी आज आपण रामजन्मभूमी, रामाचं जन्मस्थान अयोध्या याचं स्मरण करतो त्यामुळे हे अवतार पुरुष ज्या आईच्या गर्भामधून जन्म घेतात ते निवडून, ताऊन सुलाखूनच होतं आणि याला शास्त्रीय आधार आहे. तुम्ही जर त्यांच्या आई, त्यांची आई, त्यांची आई कोण होती असं जर अभ्यासायला गेलात तर लक्षात येईल, त्यांच्या आधीच्या सात पिढ्या अत्यंत शुद्ध सात्त्विक आहेत. तेव्हा हे पुढचे अवतार झालेले आहेत. जे अवतारी पुरुष असतात त्यांची जी माता असते तिच्या पोटी हा असा पुरुष जन्माला येतो की ज्यांच्या मृत्यूनंतर शंभर




*श्री. राजेंद्र वालेकर आपले विचार व्यक्त करताना*

वर्ष झाली तरी आपण त्यांची पुण्यतिथी साजरी करतो. त्याच्यामागे काहीतरी दैवी रचना असते नाहीतर एका माणसामध्ये एवढे सगळे गुण निर्माण होणे हे केवळ अशक्य आहे. एका एका गुणावरती माणसं आयुष्य काढतात. एखादा सुंदर चांगला चित्रकार असेल तर त्याला बाकी काही माहीत नसते, एखादा चांगला गणितज्ज्ञ असेल त्याला संस्कृत येत नसतं, चांगला संस्कृत पंडित असतो त्याला इंग्रजी भाषा येत नसते, एखादा ज्योतिषी असतो त्याला विज्ञान येत नसतं. पण एकच व्यक्तिमत्त्व असं होतं यांच्यामध्ये इतके सगळे गुण एकत्र होते आणि संपूर्ण ४० वर्ष आणि त्याच्या आधीच्या शैक्षणिक अवस्थेपासून ४० वर्षांच्या कर्तृत्वाच्या आलेखामध्ये त्यांनी त्या प्रत्येक गुणाचा उपयोग केला आहे. नुसतं मला हे येतं आणि मी माझ्यापुरतं ठेवलं असं न करता त्या प्रत्येक गुणाचा उपयोग भारताच्या स्वातंत्र्याकरिता केलेला आहे. म्हणजे त्यांच्या गुणांच्या बिंदूंचे एक वर्तुळ काढले तर त्याचा मध्यबिंदू हा स्वराज्य होता. त्या वर्तुळावरील सगळे बिंदू जोडले तर त्या प्रत्येक बिंदूचा विचार करताना त्यांनी मुख्य मुद्दा हा स्वराज्य, देशाचं स्वातंत्र्य हा मध्यबिंदू ठेवून त्याच्याभोवती विणलेला गोफ आहे असं आपल्या लक्षात येईल. म्हणजे एकेका गुणाचा विचार केला तर ती स्वतंत्र प्रज्ञा होती, प्रज्ञा म्हणजे बुद्धी. एवढी प्रचंड विद्वत्ता होती की कोणतीही गोष्ट एकदा वाचली की पुन्हा त्यांना वाचावी लागत नसे. मघाशी मी गीतरहस्याचा उल्लेख केला त्याच्याबद्दल अशी एक गोष्ट सांगतो की, मंडालेहून सुटल्यानंतर त्यांना एकट्यालाच घेऊन आले होते. सामान थोडंसं त्यांच्यासोबत पाठवलेलं होतं, कारण अत्यंत गुपचुप त्यांना तिथून आणलं होतं आणि कुठे जाणार आहोत हे माहीत नव्हतं. आणि ते गीतारहस्याचं बाड होतं मोठं, ते दुसऱ्या सामनाबरोबर येणार होतं, आणि त्यांच्या सहकाऱ्याने पुण्यात आल्यावर विचारलं की टिळकमहाराज, दादा म्हणत असत त्यांना, मोठा अभ्यास करून तुम्ही ग्रंथ लिहिलाय गीतारहस्यासारखा, समजा हे बाड ब्रिटिशांनी तुम्हाला दिलंच नाही तर काय कराल? टिळकांनी असं त्यांच्याकडे पाहिलं आणि शांतपणे उत्तर दिलं, ''अरे काहीच नाही, मी एक महिना सिंहगडावर विश्रांती घ्यायला जाईन, आणि एक महिन्यात जसा होता तसा ग्रंथ परत लिहून काढीन. कारण ग्रंथ माझ्या डोक्यात आहे, कागदामध्ये नाही.'' हे कसं निर्माण झालं त्यांच्यामध्ये? तर ज्याला मी अवतारी पुरुष म्हणतो त्याला बाकी काहीच करावं लागत नाही, हे सगळं नैसर्गिकच असतं आणि ते त्यांच्यामध्ये होतं, म्हणून ते श्रेष्ठ झाले. महाराष्ट्रात अनेक लोक होते. पण टिळकांएवढी प्रचंड प्रज्ञा, मेधा, बुद्धी ही इतरांमध्ये होती का ? न्यायमूर्ती रानडे त्यांच्याइतके, त्यांच्यापेक्षा जास्त तोडीचे अर्थशास्त्री होते, फिरोजशहा मेहता होते, गोपाळ कृष्ण गोखले होते. टिळकांची तर्कशुद्ध पद्धत होती. कारण त्यांचा पाया गणिताचा होता. म्हणजे फिरोजशहा मेहतांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये जे अर्थविषयावरती आपलं म्हणणं मांडलं होतं, ते मराठी भाषेमध्ये वृत्तपत्र काढल्यानंतर इथल्या जनतेला कळावं म्हणून, फिरोजशहा मेहतांच्या तुल्यबळ त्यांचे विश्लेषण करून वर्तमानपत्रात छापायचं हे सोपं नव्हतं. कारण त्याला तितक्यात तोडीचा अर्थशास्त्रज्ञ लागतो. म्हणजे माझं गणित चांगलं आहे तर नुसतं गणित चांगलं म्हणून उपयोग नाही, तर माझं अर्थशास्त्रपण चांगलं असायला पाहिजे, हा दुसरा गुणधर्म.

आज आपण बजेटवरती दुसऱ्या दिवशी पाहतो रुपया कसा आला, रुपया कसा गेला. वर्तमानपत्रातही एक गोल येतो, रुपया इकडनं आला, इकडनं गेला. खिशात आपल्या काहीच राहत नाही आणि बजेटमध्ये सामान्य माणसाला काय कळतं की, काय स्वस्त झालं. मला उद्यापासून काय स्वस्त मिळणार आहे आणि काय महाग झालं. लोकमान्य टिळकांनी केसरीच्या अंकामध्ये इंग्रजांनी त्या काळात मांडलेल्या बजेटवरती अग्रलेखांची मालिका केली आणि त्या मालिकेतील अग्रलेख तुम्ही जरूर वाचावेत. सगळ्या तरुण पिढीला सारखं सांगतो की, मी सांगतोय म्हणून विश्वास ठेवू नका. अभ्यास करून तुम्ही ते शोधा, अग्रलेख ते वाचा आणि त्या वाचण्यामध्ये तुमच्या लक्षात येईल की, बजेटवरती अग्रलेख लिहिताना इंग्रजांची

*वक्त्यांचा परिचय : श्री. राजेंद्र गजानन वालेकर*

*इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर. स्वतंत्र व्यावसायिक, ज्योतिष विशारद, समाजसेवा म्हणून गेली ३८ वर्षे विनामूल्य ज्योतिष विषयक मार्गदर्शन करतात. 'वास्तूभूषण' पदवी प्राप्त, वास्तू सल्लागार काव्यलेखन, नाट्यलेखन, अभिनय, गायन, तबला-पखवाज वादन, वक्तृत्व आदींची आवड. छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास स्वामी, रामायण, महाभारत यावर विशेष अभ्यास आणि व्याख्याने, प्राचीन भारतीय वैज्ञानिक परंपरा व ऋषी मुनी यांचा विशेष अभ्यास. यांवर आजपर्यंत ४८ व्याख्याने दिली आहेत.*

*जनसेवा सहकारी बँक लि. हडपसर या बँकेत संचालक, पुणे नगर वाचन मंदिरचे मुख्य विश्वस्त.*

आकडेवारी चुकलेली आहे पण टिळकांची बरोबर आहे. महसूल गोळा झालेला आहे. इंग्रजांना सर्वात जास्त महसूल हा दारू विक्रीच्या उत्पन्नातून मिळत होता आणि याचा उल्लेख टिळकांनी त्या बजेटच्या अग्रलेखांमध्ये केलेला आहे आणि नुसता केलेला नाही तर देशभरामध्ये किती उत्पन्न मिळतं हे त्यांच्यात त्यांनी लिहिलं आहे. त्या काळामध्ये इंग्रजांना २.५ कोटी रुपये महसूल दारू विक्रीतून मिळत होता म्हणून दारूवरती बंदी करणं हे टिळकांना अभिप्रेत असलेली गोष्ट इंग्रज सरकारने केली नव्हती कारण महसूल बुडेल. आजही आपण तेच बघतो. म्हणजे अर्थशास्त्राचा नुसता दारू विक्रीतून येणारा महसूल, अशा इतर अनेक गोष्टी, म्हणजे त्या काळामध्ये मॉरिशसवरून साखर आपण आयात करत होतो. मॉरिशस त्यांच्या शेतीतून ७० टक्के साखर निर्यात करत होता आणि उरलेली रम आणि रबर.

निर्यात केलेली साखर त्या वेळी भारत देश मॉरिशसकडून विकत घ्यायचा. टिळकांनी खरंतर अग्रलेखातूनही लिहिलंय आणि पत्रही लिहिली आहेत. व्हॉइसरॉयला, गव्हर्नरला, इंग्लंडच्या राणीपर्यंत, पार्लमेंटपर्यंत पत्रे पाठवलेली आहेत. भारतासारख्या सुपीक जमिनीमध्ये ऊस उत्पादन वाढू शकतं तर त्याचे कारखाने का तुम्ही भारतात चालू करत नाही. अडीच ते तीन कोटी रुपयांची साखर आपल्याला आयात करावी लागते. जर साखर कारखाने चालू करून साखर तयार केली तर ती साखर आपण वापरू शकतो आणि आपला पैसाही देशाबाहेर जाणार नाही आणि इथल्या शेतकऱ्याला उत्पन्न मिळेल. हे अर्थशास्त्र, शेतीशास्त्र आणि बजेट याचं विश्लेषण आहे. एक माणूस काय काय करू शकतो त्याचे हे एक उदाहरण मुद्दामहून इथे सांगतो. शेती या विषयावरती कमीत कमी वीस वर्षे, वीसपेक्षा जास्त वेगवेगळ्या मासिकात त्या वेळी प्रसिद्ध होणारे लेख, अग्रलेख केसरीमध्ये ओळीने लिहिलेत. मी मुद्दामहून काही अग्रलेखांची नावं सांगतो म्हणजे तुमच्या लक्षात येईल की त्यांनी शेतीविषयी काय काय लिहिलंय. 'शेती आणि शेतकरी', 'जमिनीची मालकी बुडाली', 'सावकार मेला आणि कुणबी मेला', 'सारा वसुली', 'परस्पर सहकारी पेढ्या काढा शेतकऱ्यांसाठी', असा शेतकऱ्यांचा अभ्यास करून टिळक ब्रिटिश सरकारला सुचवत आहेत. आणि त्याचे दाखले देताना असे म्हणतात, ''अमेरिकेमध्ये शेतीची महाविद्यालयं, शाळा आहेत. त्या भारतामध्ये तयार केल्या पाहिजेत. त्याचं शिक्षण त्यांना दिले पाहिजे. त्यांच्या जमिनीची प्रतवारी तपासली पाहिजे. कोणाच्या जमिनीत काय निर्माण होऊ शकतं, त्यासाठी कोणती खत वापरली पाहिजेत त्याचं शिक्षण त्यांना दिलं पाहिजे. आणि त्या पद्धतीने सारा वसुली केली पाहिजे. यामध्ये आसेतुहिमाचल एकाच साऱ्याचा, वसुलीचा मीटर सर्वांना लावून उपयोगाचा नाही हे टिळकांच्या अग्रलेखांमध्ये १८८५, १८९०, १९०५ इथपर्यंत लिहितायत.

त्या वेळेला भारतामध्ये ८० टक्के जनता शेती करत होती आणि शेतकरी हा कायम कर्जबाजारी राहत होता. त्याला कर्जातून कसे मुक्त करायचे याचे धडे टिळक अग्रलेखातून लिहून सरकारला कळवत आणि शेतकऱ्यांच्या प्रति काम करत होते. इतकंच नाही तर दुष्काळ पडला म्हणून शेतकऱ्यांना ब्रिटिश सरकार अनुदान द्यायला सुरुवात करायचे, अनुदान द्यायचं तर त्या अनुदानासाठी नियमावली म्हणजे आज आपल्याकडे असतं ते पांढरं रेशन कार्ड, पिवळं रेशन कार्ड किंवा त्याचं उत्पन्न सरासरी एवढं पाहिजे किंवा घरामध्ये कर्ती लोकं एवढी पाहिजेत, हे जे आजचे नियम आहेत हे ब्रिटिश त्या काळामध्ये इंग्रजीमध्ये प्रसिद्ध करायचे. आता भारतातल्या शेतकऱ्यांना ते इंग्रजी पेपरमधले प्रसिद्ध केलेले डॉक्युमेंट तो वाचणार कधी, त्याला समजणार कधी, आणि तो त्याचा लाभ घेणार कधी? टिळकांनी याच्यावर उपाय म्हणून स्वतःच्या केसरी पेपरमध्ये त्याची पॅम्प्लेट त्या काळामध्ये छापली आणि ती जागोजागी गावोगावी वाटली. पेणमध्ये सहा हजार पत्रके त्यांनी वाटली. कितीतरी शेतकरी त्या वेळी अनभिज्ञ होते. त्या सहा हजार पत्रकांचे वाटप करण्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर केला तर तिथल्या अधिकाऱ्यांनी ते गठ्ठे जाळून टाकले, कारण शेतकऱ्याला काही द्यायचंच नाही आहे. शेतकऱ्यांच्या प्रति कागद पोहोचला पाहिजे म्हणून सार्वजनिक सभेचे कार्यकर्ते व टिळक स्वतः ते पॅम्प्लेट शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन वाटायचे व त्याच्यामधले नियम होते की काय कागदपत्रे घेऊन जा, काय काय सांगा म्हणजे तुम्हाला त्याचे पैसे मिळतील. शेतकऱ्यांसाठी आज कुणीही हे करत नाही, हे त्या काळात शेतकऱ्यांसाठी टिळक करत होते. म्हणजे एक व्यक्ती जो गणितज्ञ आहे, अर्थशास्त्राचा अभ्यासक आहे, जो हुशार आहे, जो बुद्धिमान आहे, लेखन हा त्याचा आत्मा आहे, जो 'एल. एल.बी.' झालेला आहे, 'एल.एल.बी.'नंतर स्वतःचा संसार चालावा म्हणून कायद्याचे क्लासेस चालवणारा आहे आणि ते क्लासेस चालवून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंब चालेल, केसरीतून मिळणारा पैसा हा माझ्या कुटुंबाचा नाही, इतकी परखड भूमिका घेणारा माणूस इंग्रजांना खूपला नसता तरच नवल होतं.

टिळकांवरती दोन राष्ट्रद्रोहाचे खटले लादले गेले. १८९७ला दीड वर्षासाठी १९०८ला सहा वर्षासाठी, ते खटले लादण्याआधी १९०५-१९०६ साली मुंबईमध्ये एक मोठी सभा झाली. कामगारांचा मेळावा झाला. आणि त्या कामगारांच्या मेळाव्यामध्ये लोकमान्य बोलायला उभे राहिले. किती कामगार जमले असतील? टिळकांचे भाषण ऐकायला आलेल्या उपस्थित कामगारांचा एक लाख पंचाहत्तर हजार हा सरकारला पोलिसांनी कळवलेला अधिकृत आकडा आहे. त्या वेळी मुंबईची लोकसंख्या होती बारा लाख आणि त्यातले एक लाख पंचाहत्तर हजार कामगार त्या सभेला उपस्थित होते. त्या व्हॉईसरॉयनी असं कळवलं, आपलं सैन्य ब्रिटिशांचे दीड लाख आहे आणि जो माणूस त्याच्या प्रश्नांसाठी लोकांना एकत्र करतो ती संख्या

जर पावणेदोन लाख कामगार एका ठिकाणी जमत असतील तर हा ब्रिटिश सत्तेला कधीही शह देऊ शकतो. तात्काळ याला देशाबाहेर घालवण्याची व्यवस्था करा, असे कायद्यात बदल करा की ज्यातून या माणसाला देशाबाहेर घालवा आणि १२४ जे देशद्रोहाचं राष्ट्रद्रोहाचं कलम आहे, यामध्ये संसदेमध्ये दुरुस्ती करतात आणि त्यातली जी कलमं आहेत त्यात टिळक कुठे सापडत नाहीत कारण ते स्वतः 'एल. एल.बी.' आहेत. त्यांच्या एकाही अग्रलेखावरती ब्रिटिश संसदेमध्ये खटला दाखल होऊ शकला नाही, ब्रिटिशांना दाखल करता आला नाही. ५१३ अग्रलेख लिहिले त्यांनी केसरी आणि मराठा मधून. जर ब्रिटिशांनी यांना देशाबाहेर घालवायचेच असे ठरवले नसते, तर कायद्याच्या कसोटीवर कुठल्याही अग्रलेखावरती खटला दाखल होऊ शकला नसता. कोणताही अग्रलेख काढून वाचा आणि त्याच्यामध्ये ते असे सुरुवातीला इंग्रजांचं सरकार कसं चांगलं आहे, जनताभिमुख कसं काम करतंय, असं शाल जोडीतून लिहून मग त्यांचे वाभाडे काढायचे आणि अग्रलेखांच्या शेवटी कायदेशीर बाबींचा उहापोह करायचे. ब्रिटिश गव्हर्नरनी ब्रिटिश पार्लमेंटला, इंग्लंडच्या राणीला लिहिलेले पत्र आता उपलब्ध झालेले आहे. तुम्हाला ते मिळाले तर जरूर वाचा. त्या पत्रात त्यांनी असे लिहिले की, असं लक्षात येते की Mr. B. G. Tilak consistently and sincerely studied all our laws and loopholes in British Parliamentary System. भारतीय बाळ गंगाधर टिळक या माणसांनी ब्रिटिशांच्या कायद्याचा इतका बारीक अभ्यास केलेला आहे आणि त्यातले दोष इतके शोधलेले आहेत की, तुम्ही काय वाटेल ते करा, जोपर्यंत तुम्ही कायद्यात बदल करत नाही, तोपर्यंत तुम्ही त्याला पकडूच शकणार नाही. आणि केवळ लोकमान्य टिळकांना तडीपार करायचं, बाहेर पाठवायचं म्हणून तो कायदा बदलला. १२४-अ कलम घातले त्याच्यात की, जनतेला चिथावणी देणारे लेखनसुद्धा राष्ट्रद्रोह समजला जाईल. तेव्हा कुठे त्यांच्यावरती खटला दाखल करावा लागला किंवा करता आला. आपण तरुण मुलांनी, शाळेतल्या मुलांनी ह्या गोष्टींचा बारकाईने अभ्यास करायला पाहिजे. म्हणजे मी नेहमी सांगताना असं सांगतो की, आपल्याला आपला इतिहास शिकवलाच नाही. आपल्याला ना टिळक शिकवलेत, ना सावरकर शिकवलेत.

मी आता टिळकांच्या स्मारकाला वंदन करून आलो त्याच्यामध्ये डावा हात छातीवर आहे आणि उजव्या हाताचं बोट वर आहे आणि ते सांगतायत की, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि ते मी मिळवीनच इंग्रजांना एवढं जाहीरपणे सांगणारा संपूर्ण स्वातंत्र्यलढ्यातला हा एकमेव माणूस आहे. स्वराज्यासाठी इंग्रजांना डायरेक्ट त्याने चॅलेंज केलेले आहे. बाकी सगळे नेमस्त आहेत. ते अर्ज करून, विनंती करून, त्याच्यावरती सरकार जे दोन तुकडे टाकेल त्याच्यातला एक घेऊ. तो चघळू आणि मग राहिलेल्याचा विचार करू अशा पद्धतीचे होते. हा पहिलाच माणूस असा होता की ते स्वातंत्र्य मी मिळवीनच इतका ठामपणे ब्रिटिशांना सांगणारं व्यक्तिमत्त्व होतं. म्हणजे त्यांचा निर्धार जाज्वल्य निर्धार अभिमान देशाप्रती!

स्वतः अत्यंत पारंपरिक होते. त्यांची एक गोष्ट सांगतो. भारतीय परंपरांचा अभ्यासही होता आणि अत्यंत प्रेम होतं त्यांचं भारतीय परंपरांवर. त्यांच्या घरी एकदा श्राद्ध होतं. त्याच्या आधी पंचहौद मिशन म्हणून जे आहे पुण्यामध्ये तिथे एक बैठक झाली होती आणि त्या बैठकीला लोकमान्य गेले होते. त्या बैठकीला कपातून चहा प्यायला दिला. त्या काळातील पुणे आहे. त्या काळामध्ये त्या पंचहौद मिशनच्या कार्यालयामधील बैठकीमध्ये कपातून चहा प्यायले म्हणून पुण्यातील ब्राह्मणांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यावर त्यांनी केसरीमध्ये असं लिहिलं की एका कपात विरघळण्याएवढा माझा धर्म कच्चा नाही. कोण म्हणतो मी धर्म बुडवला? जर मी धर्म बुडवला असं वाटत असेल तर धर्मावर चर्चा करण्यासाठी समोर या! मागून वार करू नका! असं ते अग्रलेखात लिहितात..

वडील गेल्यावर त्याचा सांभाळ त्यांच्या पुण्यातल्या काकांनी गोविंदपंतांनी केला. ते काका असं म्हणत होते, "अरे, तू आता सातवी झाला आहेस. आता कुठेतरी सरकारी कचेरीत नोकरी कर, संसार कर." ते म्हणाले, "काका मला शिकायचं आहे." "कसं शिकणार?" "माझ्या वडिलांनी माझ्यासाठी पैसे ठेवलेत! टिळकांच्या वडिलांनी त्यांच्या मृत्यूपूर्वी त्या काळामध्ये पाच हजार रुपये ठेवलेले होते असे पत्र लिहिलेले होते भावाच्या नावाने की माझी मुलं मोठी होऊन स्थिरस्थावर होईपर्यंत या पाच हजार रुपयांमधील भांडवल किंवा जगण्यासाठीचा सगळा त्यांचा खर्च हा काही वर्षांचा होऊ शकतो. मी जमवलेली पुंजी ही त्याच्या सुपूर्द करावी. म्हणजे वडिलांनी किती काटकसर केली असेल.

वडील विद्वान होते. त्यांनी एक त्रिमितीय गणित नावाचं पुस्तक लिहिलं होतं. ते पुस्तक इतकं भारी आहे की ते शिकवल्यानंतर या इथून बहुतेक सर्व गणितज्ञच बाहेर पडतील, हे एक इंग्रज अधिकारी लिहितो. ते पत्रही पुण्यामध्ये टिळक संग्रहालयात केसरी वाड्यात आज उपलब्ध आहे. तुम्ही जाऊन बघा आवर्जून! आणि ते पुस्तक तो ब्रिटनला पाठवतो. तिथले गणितज्ञ ते पुस्तक पाहून म्हणतात की या पुस्तकाचा अभ्यास केला तर भारतातली आपली लोकं आपल्याला परत आणावी लागतील; कारण लोकं इतकी हुशार होतील गणितामध्ये व आपला डॉमिनन्स राहणार नाही. मग यात सरकारला धोका आहे. सगळं कुठे जोडायचं शेवटी? सरकारला धोका! बंदी घाला!!

महाराष्ट्राला एक शाप आहे. महाराष्ट्रातलाच एक अधिकारी, जो टिळकांच्या वडिलांच्या समकक्ष होता, त्यांनीच ब्रिटिश अधिकाऱ्यांना एक पत्र लिहिलं की हे ब्रिटिशांच्या पुस्तकाचे भाषांतर आहे. त्यामुळे याला महत्त्व देऊ नये आणि ताबडतोब अभ्यासक्रमातून

हद्दपार करावे. तो ब्रिटिश अधिकारी मात्र हुशार होता. त्याने असं सांगितलं, जर तुम्हाला असं वाटलं की हे कोणत्यातरी मूळ इंग्रजी पुस्तकाचं भाषांतर आहे तर ते इंग्रजी पुस्तक तेवढं मला आणून द्या किंवा त्याचं नाव सांगा, मी ताडून बघतो आणि निर्णय करतो! ती तिन्ही पत्रं आता केसरी संग्रहालयात आहेत. टिळकांचं गणित पक्कं का होतं, कसं होतं, त्याचं ओरिजिन कुठून होतं हे मी तुम्हाला सांगतो. मुलाची गोष्ट आहे. विश्वनाथ त्यांचा मोठा मुलगा. हा फर्ग्युसन कॉलेजला होता. रँग्लर परांजपे प्राचार्य म्हणून काम करत होते आणि ते गणित शिकवत होते. एकदा जाताना ते एक गणित घालून गेले आणि म्हणाले उद्या येताना सोडवून आणा. ते गणित इतकं अवघड होतं की वर्गात कुठल्याच मुलाला ते सोडवता येत नव्हतं. पण विश्वनाथला हे नक्की माहिती होतं आपले वडील हे गणितज्ञ आहेत. विचारलं तर त्याचं उत्तर ते आपल्याला नक्की देऊ शकतात. तो घरी आला. लोकमान्यांची एक खासियत होती. रात्रीचे जेवण झालं की, त्यांच्या घरी एक झोपाळा होता. आजही तो झोपाळा टिळक वाड्यात आहे. जाऊन बघू शकता.

ते झोपाळ्यावरती बसायचे, एक पाय असा मांडीवर घ्यायचे, एका पायावर असं असं थापटी मारायचे, लगेच अडकित्ता घ्यायचे सुपारी कातरायचे, सुपारीचे चार दाणे तोंडात टाकता टाकता मुलांना आपले विचारायचे आज अभ्यास काय केला, वर्गात काय शिकवलं, काय काय लिहिलं, काय येत नाही, मी काही मदत करू शकतो का? कुटुंब वत्सलता! रोज एवढेच विचारायचे आणि एक परिपाठ होता रोज एक श्लोक एका मुलाने पाठ करायचा. आज एक श्लोक पाठ करायचा. उद्या दुसरा एक श्लोक पाठ करायचा आणि तो टिळकांना म्हणून दाखवायचा, आणि दुसरा पाठ करताना पहिला म्हणायचा आणि मग दुसरा म्हणायचा. वर्षात ३६५ श्लोक मुलांचे पाठ व्हायचे. टिळक पुण्यात नसले तरी श्लोक पाठ करून घ्यायचं काम त्यांच्या पत्नी करायच्या हे प्रमाण होतं आणि टिळकांना सांगायच्या काल दोन अधिक एक, त्या फारशा शिकल्या नसल्याने त्यांना कळायचं. त्या म्हणायच्या कालचे दोन आणि आजचा एक असे तीन म्हटले. मागचे चार आणि आजचा एक असे पाच म्हटले, असे त्या सांगायच्या म्हणजे रोज श्लोक म्हटले जात आहेत हे त्या कळवायच्या. तर विश्वनाथने विचारले, ''सरांनी एक गणित दिलंय आणि ते काही मला सुटत नाही. वर्गातल्या सगळ्या मुलांनी प्रयत्न केले पण आम्हाला गणित काय कोणाला सुटलं नाही.'' म्हटले, बघू? त्याने ते गणित टिळकांना दाखवलं. त्यांनी ते असं बघितलं फक्त आणि त्याचं उत्तर सांगितलं. तो म्हणला हे मी असे सांगितले तर लगेच कळेल की मी सोडवलेलं नाहीये. मला उत्तर कसं आलं, मी काय केलं म्हणून उत्तर आलं, काहीतरी सिस्टीम सांगा म्हणजे पायऱ्या सांगा त्याच्या! टिळकांनी त्याचाच कागद पुढे घेतला त्यावर तीन पायऱ्या लिहिल्या आणि चौथ्या पायरीत उत्तर लिहिलं आणि जा म्हणले दाखव. दुसऱ्या दिवशी रँग्लर आले वर्गामध्ये शिकवायला. कालचं गणित त्यांना स्वत:लाच माहीत होतं की ते किती अवघड आहे आणि म्हणाले 'काय कोणाला आले नसेलच!' विश्वनाथ अगदी सगळ्यात शेवटी गेला म्हणला, 'मी सोडवलय गणित.'

ते म्हणाले, ''थांब जरा, दाखवतो आधी आणि मग आपण तपासू.'' म्हणून त्यांनी फळ्यावरती ते गणित सोडवायला सुरुवात केली. जवळजवळ २८ पायऱ्या लिहिल्या गणिताच्या सोडवण्याच्या आणि शेवटी त्याचं उत्तर दाखवलं. ते उत्तर विश्वनाथच्या कागदावरचं आणि रँगलरनी सोडवलेलं ती दोन्ही उत्तरं सारखीच होती. विश्वनाथ म्हणाला, ''एवढ्या पायऱ्यांची आवश्यकता नाही आहे हे गणित सोडवायला. तीन पायऱ्यांमध्ये हे गणित सोडवता येतं. ते म्हणाले कसं शक्य आहे. तो म्हटला, हे बघा मी सोडवलं. रँगलर र.पु. परांजपेंनी तो कागद हातामध्ये घेतला, अशी नजर टाकली त्याच्यावर, विश्वनाथकडे पाहिलं आणि त्याला म्हणाले, ''दादांना माझा नमस्कार सांग.''

टिळकांच्याबद्दल अजून एक कथा सांगितली जाते. एक जण त्यांच्याकडे भेटायला आला आणि म्हणाला की, मला गणिताबद्दल चर्चा करायची आहे. ते म्हणाले की संध्याकाळी ये. सायंकाळी तो आला तेव्हा झोपाळ्यावर बसून टिळक अग्रलेख सांगत होते. अग्रलेखाच्या काही ओळी लेखनिकाला सांगून झाल्या की तो लिहीपर्यंत टिळक आलेल्या माणसाच्या गणिताच्या शंका निरसन करायचे आणि तो पुढची शंका विचारीपर्यंत अग्रलेखाच्या पुढच्या काही ओळी सांगायचे. एकीकडे अग्रलेख एकीकडे गणित! असा संपूर्ण अग्रलेख लिहून त्यांनी सगळी गणितं, त्यांच्या शंकांचं निरसन केल्यानंतर त्या माणसाने डोक्याला हात लावला! माझ्याशी गणिताबद्दल बोलतो त्या वेळी अग्रलेखातील एकही शब्द येत नाही आणि अग्रलेखात जी माहिती सांगतो त्या वेळी गणिताबद्दल बोलत नाही. म्हणजे, कंपार्टमेंटल बुद्धिमत्ता! त्या पगडी खाली जे काही होतं ना रसायन त्या रसायनातला एक कण जरी आपण आपल्या आयुष्यामध्ये गोंदवू शकलो तर तो एक कण आपली जिंदगी बदलेल. मित्रांनो, मी तुम्हाला एवढेच सांगतो, तुम्हाला आवडेल ते क्षेत्र घ्या, त्यांची बुद्धी घ्या, त्यांचं गणित घ्या, त्यांचा वक्तृत्व घ्या, त्यांचं लेखन घ्या, त्यांचा अभ्यास घ्या, त्यांची धर्मनिष्ठा घ्या, त्याचं तत्त्वज्ञान घ्या, त्यांचं पारंपरिक ज्ञान घ्या, त्यांचा कर्मयोगीपणा घ्या, त्यांचा ओरियनचा अभ्यास घ्या, मी त्याबद्दल सांगणारच आहे. 'आर्क्टिक होम इन वेदाज' म्हणजे वेद कुठे लिहिले, कधी लिहिले ते 'ओरायन'मध्ये सांगितले आणि कुठे लिहिलंय हे 'आर्क्टिक होम इन वेदाज'मध्ये सांगितले.

काय वाचल्यावर नेमकं काय घ्यायचं आणि त्याचा तर्कशुद्ध

प्रतिवाद कसा करायचा, कायद्याचा अभ्यास कसा करायचा, या सगळ्याचा उपयोग स्वातंत्र्यलढ्यात केला. शेतीविषयक सांगितलं, अर्थकारण सांगितलं. एका गाण्याच्या कार्यक्रमाला टिळकांना बोलावलं. शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम होता टिळकांना बोलावलं. दोन-अडीच तासाचा कार्यक्रम टिळक पूर्णवेळ उपस्थित होते.आणि गाण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर गवयाबरोबर नंतर चहा पिताना अर्धा तास त्यांनी गाणे या विषयावर चर्चा केली. गाण्याचे आरोह अवरोह, गाण्याचे सप्तसर, त्यातलं संगीत, त्यातलं वर्म, कोणत्या स्वरावर जोर द्यायचा, कोणत्या रागदारीवरून कशा पद्धतीने गाणं बदल करून दुसऱ्या रागात जाता येतं याच्यावर त्यांनी चर्चा केली आणि हे लिखित आहे. त्या माणसाला वाटलं की हा म्हणत होता माणूस की मला गाण्यातलं काही कळत नाही! मग एवढ्या बारकाईने तो अभ्यास करून आपल्याशी बोलतोय कसा? ते म्हणाले काहीच नाही या गाण्याच्या कार्यक्रमाला येण्याआधी चार पुस्तकांमधलं वाचून आलो होतो गाणं म्हणजे काय असतं !

टिळकांचा आवाज पातळ होता. मेडिकल सायन्सेस तज्ज्ञ आहेत त्यांनी अभ्यास करून सांगावं हे बरोबर आहे का? जो माणूस मनाने कठोर असतो, मनाने अत्यंत निर्भीड असतो किंवा मनाने ठाम असतो त्यांच्या सगळ्यांचे कंठ हे पातळ असतात. त्यांच्या आवाजामध्ये जरब असते. सावरकरांचाही आवाज तुम्ही ऐकला असेल आवाज पातळ आहे सावरकरांचा कारण ते मनाने इतके स्ट्राँग होते. एवढे हालअपेष्टा सोसल्या! टिळकांनी पण सोसलेल्या आहेत. त्यांना दोरी वळायला लावलेली आहे, त्यांना कापूस पिंजायला लावलेला आहे, दोऱ्यातून धागे वेगळे करायला लावलेले आहे. रंग द्यायला लावलेलं आहे. दोऱ्यांना रंग द्यायचं काम कपड्यांना रंग द्यायचं काम तुरुंगामध्ये त्या माणसाला करायला लावलेलं आहे. त्याच्यावरती त्यांनी निळ तयार केल्यानंतर निळेचे उपयोग, निळीची शेती याच्यावरती त्यांनी लेख लिहिलेले आहेत. म्हणजे त्यांच्या आयुष्यामध्ये एकही क्षेत्र नाही ज्याच्यामध्ये त्यांनी त्यांचं प्रभुत्व दाखवलं नाही. सगळ्यांचा शेवट किंवा मध्यबिंदू हा स्वराज्य किंवा देशाचे स्वातंत्र्य आहे.

आपल्या बुद्धीतल्या प्रत्येक घटकाचा, प्रत्येक ज्ञानाच्या पैलूंचा उपयोग हा देशाच्या स्वातंत्र्यासाठीच झाला पाहिजे इतकं त्यांच्या मनामध्ये स्वातंत्र्य ठासून भरलं होतं. म्हणजे १८५६चा जन्म आहे. गोळ्यांमध्ये किंवा सांगिनीला डुकराची किंवा गाईची चरबी लावलीय याच्यावरून १८५७ला पहिलं बंड झालं. त्या आधारावर टिळकांनी इंग्रज सरकारशी पत्रव्यवहार केला की सैन्यामध्ये जो तुम्ही शस्त्र आणि दारूगोळा वापरता त्याचे कारखाने भारतामध्ये काढा. भारतामधल्या सैनिकांना हे नक्की कळू देत की हे कारखान्यातले शस्त्रातले दारूगोळ्याचे सगळे पदार्थ भारतात बनलेले असून याच्यामध्ये अशा प्रकारची कुठलीही चरबी गाईची किंवा डुकराची लावलेली नाही आणि मग भारतीय सैनिक हे लढण्यासाठी तुम्हाला उपयुक्त ठरतील!

टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले.डॉक्टर विश्वास हुमणे यांनी त्यांच्या फक्त अग्रलेखावर 'पी.एच्.डी.' केली आहे! पुण्यामध्ये चार-पाच वर्तमानपत्रं होती. त्यातील एक वर्तमानपत्र टिळकांवरती टीका करणारं होतं. टिळकांनी एखादा विषय मांडला तर त्याला विरोध हे त्या वर्तमानपत्राचा मध्यबिंदू! दुर्दैवाने एक दिवस ते अग्रलेख लिहिणारे वर्तमानपत्राचे संपादक आजारी पडले आणि केसरीत जे लिहिलेलं आहे, ह्याला आता प्रतिवाद कोण करणार? त्या माणसाने काय करावं? त्यांनी लोकमान्यांनाच विनंती केली, 'अहो! माझा तेवढा अग्रलेख लिहून देता का?'

टिळक लोकांसाठीच जन्माला आलेले व्यक्तिमत्त्व, ते हो म्हणाले! त्यांना माहीत होतं, की हे वर्तमानपत्र आपल्यावर टीका करते. आपल्या प्रत्येक गोष्टीला विरोध करणार हे माहिती असल्यामुळे त्यांनी त्या वर्तमानपत्राचा अग्रलेख लिहायला घेतला आणि तो लिहून पाठवला. स्वतःवर अग्रलेखात टीका करून घेतली आणि ते इतके बिनतोड सवाल केले होते की त्याच्यासाठी टिळकांना दुसऱ्या अग्रलेख लिहून काढावा लागला आणि ते मुद्दे खोडून काढावे लागले म्हणजे दोन्ही बाजूंनी एका गोष्टीवर वाद आणि प्रतिवाद. त्यांना लोक म्हणायचे की वादामध्ये तुम्हाला कोणी जिंकू शकत नाही कारण एका माणसात काय होऊ शकतं आणि माणूस दुसऱ्या बाजूने कसा विचार करू शकतो या दोन्ही गोष्टी करायचे. लोकमान्य झाले ते उगीच नाही कारण लोकांच्या मनामध्ये काय आहे हे त्यांना कळत होतं. माणूस बाहेरून ओळखता येणं आणि माणूस आतून आणि मनातून ओळखला येणं हे दोन भिन्न विचार. माणसं समोर आल्यावर एक बोलतात आणि प्रत्यक्ष कृतीतून दुसरं करतात किंवा मनामध्ये दुसऱ्या गोष्टीचा विचार ठेवतात. टिळकांचा अग्रलेख किंवा टिळकांचे वक्तृत्व लोकांना हृदयस्पर्शी का वाटत होतं याचे इंग्रजांनी काढलेले निष्कर्ष मी तुम्हाला सांगतो. ते म्हणाले कोणत्याही जडजंबाळ शब्दांशिवाय लिहिलेली वाक्यं, छोट्या वाक्यातून अर्थपूर्ण मांडलेले विचार आणि हृदयाला स्पर्श करून जाणारे शब्द हे टिळकांचे तीन ओळीचं गमक इंग्रजांनी लिहिलेलं आहे.

इंग्रजांचा रिसर्च आहे टिळकांवरती की, एवढा माणूस हा इतक्या विषयांवर अभ्यासपूर्ण बोलतो, करतो, वागतो आणि लिहितो आणि लोक त्याच्यासाठी एकत्र येतात एवढ्या हजारो, लाखो संख्येने आणि हा जाईल तिथे संपूर्ण देशभरामध्ये म्हणजे फक्त पुण्यामध्ये नाही, फक्त महाराष्ट्रामध्ये नाही तर देशभरामध्ये! असं काय आहे रसायन की, ज्याच्यामध्ये टिळकांच्या भोवती सगळे फिरतात किंवा संपूर्ण राजकारण हे टिळकांच्या भोवती फिरतं? महाराष्ट्राचं, देशाचं राजकारण टिळक बोले आणि देश चाले. लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचं काम टिळकच करताहेत.

सामाजिक सुधारणा म्हणजे, पुण्यामधल्या ज्ञानेश्वर चौकाच्या शेजारी दारूचा एक गुत्ता होता. तो बंद करण्यासाठी आंदोलन झालं तर टिळक स्वतः दारूबंदीची पत्रक वाटत होते. तो फोटो पण आज त्या लोकमान्य संग्रहालयात उपलब्ध आहे. दारू, जुगार या गोष्टींना विरोध करण्यासाठी स्वतः बाजारात उतरून ते काम करत. सामाजिक टिळक म्हणून एक स्वतंत्र विषयावर बोलता येईल. बालविवाहाला बंदी, विधवांचा पुनर्विवाह करावा हे; जिथे चहाच्या कपातून चहा प्यायला तर त्यांच्यावर बहिष्कार घातला गेला, त्या काळात ते पुनर्विवाहाला परवानगी देत होते. हा खूप महत्त्वाचा विषय आहे जो पुढे महर्षी कर्वे यांनी १९०५पासून हाती घेतला आणि पुण्याच्या हिंगण्यामध्ये त्यांनी शाळा काढली. आज आपण ढोल, ताशे वाजवतो गणपती मिरवणुकीमध्ये. हे ढोलताशे मिरवणुकीमध्ये वाजवायला बंदी होती भारतामध्ये. कोणत्याही मिरवणुकीमध्ये ढोल आणि ताशा वाजवायचा नाही, असं लेखी फर्मान होतं इंग्रजांचं. लोकमान्य टिळकांच्या पत्रांमुळे आणि टिळकांनी केलेल्या भांडणामुळे लोकमान्यांना पहिल्यांदा मिरवणुकीमध्ये ढोल आणि ताशे ही पारंपरिक वाद्यं, झांज आणि घंटा; आज जी आपण सगळ्या गणपतीच्या मिरवणुकीत पाहतो, शिवजयंतीच्या उत्सवात त्याची परवानगी १९१६ साली मिळाली. त्यांचंही परवानगीचं पत्र उपलब्ध आहे.

इंदूरला एकदा गेले होते तिथल्या एका सरदाराच्या घरी गणपतीचा उत्सव सुरू होता. तो पाहिल्यानंतर त्यांच्या असं लक्षात आलं की लोकसंग्रह करण्यासाठी याचा उपयोग करता येऊ शकतो. पुण्यामध्ये गणपती तर शिवाजीमहाराजांच्या काळातही सुरू होते. पेशव्यांच्या काळामध्ये गणपतीचे खूपच मोठे प्रस्थ पुण्यामध्ये होते. पुण्याला गणपती नवीन नव्हते. खाजगी वाड्यांमध्ये गणपती बसवले जायचे. पण सार्वजनिक स्वरूपामध्ये सन १८९२-९३ साली जी गणपतीची सुरुवात केली ती इंदोरच्या गणेशोत्सवामुळे आणि तिथे जे कार्यक्रम झाले दोन-तीन दिवस, त्या कार्यक्रमांमध्ये टिळक सहभागी झाले होते आणि तिथून परत आल्यानंतर त्यांनी पुण्यातल्या लोकांना एकत्र करून उत्सवाचे महत्त्व त्यांना पटविले आणि गणेशोत्सव सुरू झाला. विंचूरकर वाड्यामध्ये पहिला गणपती त्यांनी बसविला. त्या कार्यक्रमांमध्ये दहा दिवसांच्या गणपतीत एक रविवार मध्ये यायचा. त्या दिवशी महाप्रसाद असायचा आणि त्या महाप्रसादामध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांना एकत्र भोजनाची परवानगी होती. परवानगी होती म्हणजे तेथे आवर्जून शेजारी बसून जेवण करीत असंत. महाराष्ट्रात जातिभेद पुष्कळच होता त्या काळामध्ये. परंतु गणपती उत्सवामधून जातिभेद संपवण्याचं अशा प्रकारचं क्रांतिकारी कार्य लोकमान्यांनी केले. मग मेळाव्यामध्ये स्वातंत्र्याला पूरक अशी गाणी लिहून घ्यायची. इंग्रजांवरती हल्ला करता येईल अशा प्रकारचे कडक शब्द त्यात काव्यामध्ये असले पाहिजेत. इंग्रज सरकारच्या विरोधामध्ये लोकांमध्ये रोष आणि असंतोष निर्माण झाला पाहिजे अशी पथनाट्ये त्या काळामध्ये सादर करून घ्यायची इतकंच नाही, पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून गजर आणि मिरवणुका काढायच्या की त्याचं प्रेशर पोलिसांवरती आलं पाहिजे म्हणजे दबाव निर्माण झाला पाहिजे इतका बारीक विचार टिळकांनी या उत्सवाच्या माध्यमातून केला.

पुण्याचे पाच गणपती मानाचे आपल्याला माहिती असतील. विसर्जन मिरवणुकीमध्ये विसर्जनाला पहिलं कोण ती रचना टिळकांनी लावून दिलेली आहे की ग्रामदैवत म्हणून कसबा गणपती पहिला, ग्रामदेवता म्हणून पांढरी जोगेश्वरी दुसरा, गुरुजी तालमीच्या वस्तादांनी गणपती उत्सवामध्ये काम केलं म्हणून त्यांना तिसरा मान, तुळशीबागेचा चौथा! टिळकांचा पहिला न्या असं म्हणत होते, पण ते म्हणाले नाही! ग्रामदैवत पहिलं! परंपरांचा अभिमानी असलेला माणूस विचार करताना स्व बाजूला ठेवतो पण मनामध्ये स्वराज्याचे प्रेम दाखवतोय, स्वराज्याचं आधी उद्दिष्ट ठेवतो!

बिभीषणांनी रचलेलं हनुमानाचं एक वडवानल स्तोत्र आहे. त्या स्तोत्रामध्ये शेवटी बिभीषण असं म्हणतो की 'स्वमंत्र स्वयंत्र स्वतंत्र स्वविद्याः प्रकटय प्रकटय ।। सर्वरिष्टान्नाशय नाशय । सर्वशत्रून्नाशय नाशय । असाध्यं साधय साधय ।।' याच्यामध्ये 'स्वमंत्र, स्वयंत्र, स्वतंत्र, आणि स्वविद्या' टिळकांच्या चारीही 'स्व'चा त्या वडवानल स्तोत्रामध्ये उल्लेख आहे. ७००० वर्षांपूर्वीची गोष्ट आणि टिळकांची स्वराज्याची कल्पना!

औद्योगिकीकरणाचा विचार हा त्या काळात मांडलेला आहे की देशामध्ये कारखाने तयार व्हायला पाहिजेत. पैसा फंडचा कारखाना देशात व्हायला पाहिजे. एक एक पैसा लोकांनी गोळा करावा. औद्योगिकीकरण करण्यासाठी टिळकांनी केलेले प्रयत्न याच्यावरच स्वतंत्र एम.एस.सी.बी. जे आज आपण म्हणतो त्याची पायाभूत रचना कशी असावी याची मार्गदर्शक तत्त्वं टिळकांनी लेखी स्वरूपामध्ये ब्रिटिश सरकारला सांगितली होती आणि आज ब्रिटिशांच्या कृपेने, कारण इंग्लंड मधला कायदा आहे काही वर्ष झाल्यानंतर ती डॉक्युमेंट सगळी प्रसिद्ध करायची, ती सगळी डॉक्युमेंट आज उपलब्ध आहेत आणि त्याच्यावरती पुस्तकं उपलब्ध आहेत.

भारतात काडेपेटी तयार करण्याचा चौथा कारखाना टिळकांच्या प्रयत्नांनी, सहस्रबुद्धे नावाच्या व्यक्तीने, पुण्यामध्ये सुरू केला. मग तो बेळगावच्या पलीकडे हलवला. काडेपेटी तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल कुठून, कसा आणावा, त्याची रचना कशी करावी? स्टोअर कसं करावं, काडेपेटीच्या काड्या कशा जमवाव्या, काडेपेटीच्या वर असलेलं लेबल छापून कसं चिकटवावं इथपर्यंतचं डिटेलिंग देणारं पत्र टिळकांनी सहस्रबुद्धेंना लिहिलं. म्हणजे औद्योगीकीकरण म्हटलं की त्याबरोबर तंत्रज्ञान आलं. तंत्रज्ञानी टिळक

असे एक टिळक आपल्यासमोर येतात. आर्यभूषण छापखाना, केसरी आणि मराठा वर्तमानपत्र छापण्यासाठी विकत घेतला, मशीनरी विकत घेतली आणि वर्तमानपत्र छापायला सुरुवात केली. ४५ गुणिले ३० सेंटिमीटरचे पेपर तयार व्हायचे. त्या वेळी केसरी आणि मराठा ही साप्ताहिकं होती. आधी मराठा सुरू केला, मग केसरी छापायला घेतला. तर हे छापताना तो अंक बंद पडू नये म्हणून टिळकांनी ते विकत घेतलेलं जुनं मशीन पूर्ण डिसमेंटल केलं, पुन्हा ते जोडलं आणि पुन्हा ते चालतंय की नाही ते पाहिलं! फोटो उपलब्ध आहे केसरीच्या संग्रहालयामध्ये. संपूर्ण अंगाला ग्रीस लागलेलं आणि मशीन खाली झोपलेले आहेत आणि त्या मशीनचे सगळे बारकावे समजून घेतलेले आहेत. मशीन बंद पडलं तर काय केलं की ते चालू होईल याची 'एस.ओ.पी.' त्यांनी लिहून काढली आणि त्या एसओपीनुसार त्याचा मेंटेनन्स हा तिथले कामगार करायचे. टिळक तुरुंगात असताना वर्तमानपत्र छापण्याचे काम चालू होते आणि कारखान्याच्या मशीनमध्ये गडबड झाली. महिन्यातून एक पत्र टिळकांना जायचं त्याच्यात ह्याचा उल्लेख होता. तिथे बसून त्यांनी लिहिलं की हे - हे कर म्हणजे ते मशीन चालू होईल!

कुठल्याही गोष्टीचं तंत्र हे त्यांना पटकन कळायचं आणि ते पटकन शिकून घेण्याची जिज्ञासा त्यांच्यामध्ये होती. त्यांच्या आयुष्यामध्ये घडलेली मोठी घटना आहे. इंग्लंडला गेले होते आणि इंग्लंडला गेल्यानंतर तिथून काही यंत्रं विकत घ्यावीत छपाईसाठी त्यांच्यासाठी तिथली यंत्रं त्यांनी पाहिली. छापखान्याची प्रेस आणि तिथली प्रेस आणि तिथली मशीनरी विकत घ्यायची आणि भारतात पाठवायची तर ती पाठवताना त्यांनी पत्रं लिहिली आपल्या कामगारांना की यंत्राचा आकार १२ फूट लांब आहे. ६ फूट उंच आहे याला फाउंडेशनची गरज नाही. हे सपाट जमिनीवर उभं करता येऊ शकतं याला बोल्टसुद्धा लावण्याची आवश्यकता नाही. याच्यामध्ये कागदाचे तुकडे घालून छापण्याऐवजी याच्यात कागदाचा रोल घालून छापण्याची सोय असल्यामुळे ४५ बाय ३० केसरीचा जो अंक आहे, तो ४० बाय ६० किंवा ४० बाय ३०चा अशा दोन आकारात आपण छापू शकतो. एका वेळी दोन मशीनमध्ये छापले तर तासाला सहा हजारांचे प्रोडक्शन होते. म्हणजे रात्री बारा वाजता जरी वर्तमानपत्राचे अग्रलेख लिहून झाले आणि छापायला सुरुवात केली तरी उजाडता अडीच-तीन वाजता लोकांच्या हातामध्ये तो अंक पडेल. हे टिळकांनी इंग्लंडमधून लिहिलेलं पत्र आहे. या यंत्रामध्ये काय काय आहे, याला रॉकेल लागत नाही, हे कशावर चालते, याची जुळणी कशी करतात, ह्याच्यासाठी खिळे कसे जुळवायचे, याच्या प्लेट कशा तयार होणार आहेत, छापण्यासाठीचा रोल काय प्रेशरने सरकला पाहिजे, याची गती किती असणार आहे या सगळ्याचा, त्या यंत्राचा अभ्यास करून ते यंत्र भारतात पोहोचायच्या आधीच इथल्या तंत्रज्ञांना सांगितले आणि मग ते यंत्र इथे आल्यानंतर आठ-दहा दिवसांमध्ये ते चालू झाले म्हणजे एखाद्या गोष्टीच्या मुळामध्ये जाऊन त्या गोष्टीचे सगळे मर्म समजावून घ्यायचे हा उपयोग स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी केला. इंग्रजांच्या कायद्यातल्या त्रुटी शोधल्या. त्यांच्या मर्मावर बोट ठेवले आणि त्यांच्याच कायद्याची घोंगडी त्यांच्याच गळ्यात घातली.

इंग्रजांना त्यांचे कायदे बदलून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्याला अनुकूल तयार करण्यामध्ये, लेबर पार्टीला दोन हजार पौंडांची देणगी त्यांनी दिलेली त्या काळात. १९१८ साली दोन हजार पौंड ! ज्यामध्ये एका पौंडाची किंमत १६ रुपये होती. आणि ते दोन हजार पौंड पाठवले त्याची रिसीट केसरी संग्रहालयामध्ये आहे. टिळक जर १९२० साली मृत्युमुखी पडले नसते आणि पाच वर्षे जगले असते अजून तर १९२५ सालीच स्वातंत्र्य मिळालं असतं. कारण लेबर पार्टी १९२५ साली सत्तेत आली होती आणि त्यांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारताला स्वातंत्र्य द्यावं लागेल असा ठराव मांडला होता. पण भारतीय लोकांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली नाही, म्हणून हे द्यायची आवश्यकता नाही, असा ठराव आणून तो स्वातंत्र्याचा ठराव रद्द झाला आणि म्हणून तो ४७ सालापर्यंत लांबला आणि ४७ साली स्वातंत्र्य देणारीसुद्धा लेबर पार्टीच होती आणि पंतप्रधान ॲटली हे लेबर पार्टीचेच लीडर होते आणि त्याच वेळी भारताला स्वातंत्र्य मिळालं. टिळकांचं दूरदृष्टीचं एक अत्यंत चांगलं उदाहरण की त्यांना १९१८ साली माहिती होतं की लेबर पार्टी सत्तेमध्ये येणार आहे आणि त्यांना जर अनुकूल भूमिका आपण घेतली आणि आपलं म्हणणं त्यांना पटवून दिलं तर आपल्याला स्वातंत्र्य द्यायला हीच पार्टी उपयोगी पडणार आहे. एखादा माणूस व्हिजनरी असतो त्या व्हिजनरी दृष्टिकोनाचं हे एक मूर्तिमंत उदाहरण. इतकंच करून ते थांबले नाहीत. जपानच्या युद्धामध्ये लढलेल्या सैनिकांच्या विधवांना त्यांनी डोनेशन दिलं. काय संबंध भारताचा? काय संबंध टिळकांचा? पण लोकमान्यांना माहीत होतं, की पुढच्या भविष्यामध्ये जपान हा आपल्याला उपयोगी पडणार, जर्मनी आपल्याला उपयोगी पडणार आहे. आज आपण मोबाईल हातात आहे म्हणून म्हणतो की जगात कुठे काय घडो, दुनिया मेरी मुठ्ठी में है; त्या काळामध्ये एक पत्र पाठवलं तरी जाऊन यायला तीन महिन्यांचा काळ लागत होता, त्या काळात टिळकांचं हेरखातं इतकं प्रबल होतं की जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही काहीही घडलं तरी ते टिळकांना काही दिवसांमध्ये कळत होतं.

मुंबईमध्ये कामगारांचं आंदोलन झालं आणि इथले कामगार कशा संख्येने जमा झाले मघाशी मी जे सांगितलं, ही बातमी लेनिनला कळल्यावर लेनिनने टिळकांना पत्र पाठवले आणि त्यात रशियन राज्यक्रांतीचा जनक लेनिन, तो असं म्हणतो की आशिया खंडातले कामगार जर अशा पद्धतीने एकत्र झाले तर युरोपीय युद्धामध्ये लढणाऱ्या कामगारांना हे बळ आशिया खंडातून मिळतंय आणि त्याच्यासाठी

टिळकांना धन्यवाद दिले पाहिजेत. लेनिनला माहीत आहे टिळक काय करतात आणि टिळकांना माहीत आहे लेनिनची विचारधारा काय आहे ती!

टिळकांच्या व्यक्तिमत्त्वातील गुण तुम्ही मला वाटतं मोजले असतील कदाचित, कोणीतरी लिहिले असतील ते, जरा आकडा शोधा, बघा. तुम्हाला कळेल की एक माणूस त्याच्या आयुष्यात काय काय करू शकतो. कुठल्या कुठल्या गोष्टींच्या माध्यमातून सरकार वरती दबाव टाकता येईल आणि सरकारला कोंडीत पकडून स्वातंत्र्य कसं घेता येईल, स्वराज्य कसं मिळवता येईल याचं तंत्र हे लोकमान्य टिळकांनी निर्माण केलं. आणि म्हणून ते संपूर्ण भारताच्या इतिहासामध्ये स्वातंत्र्याचे जनक, ज्याला इंग्रजांनी दिलेला शब्द आहे, 'भारतीय असंतोषाचे जनक' हा ठपका ठेवला होता त्यांच्यावर आणि त्याची केस टिळक लढले आहेत इंग्लंडमध्ये जाऊन. बघा किती हिम्मत आहे या माणसामध्ये. वामन मूर्ती आहेत एवढीशी, पण हिम्मत किती आहे? साता समुद्रापलीकडे सहा हजार किलोमीटर जाऊन त्यांच्या देशामध्ये तो खटला दाखल केला चिरोलवरती आणि त्यावर तर्कशुद्ध विवेचन त्यांनी केलं. पहिलं महायुद्ध चाललं. भारतीय लोकांच्या सपोर्टची इंग्रजांना गरज आहे, पाठिंब्याची गरज आहे. याच्यामुळे जर मी आता खटला दाखल केला तर इंग्रजांच्या ज्युरींना भारताच्या, म्हणजे हा खटला जरी चिरोलचा असला तरी तो एका अर्थाने ब्रिटिश सरकार विरोधातच आहे. त्याच्यामुळे ब्रिटिशांना भारतीयांच्या बाजूने निकाल द्यावा लागेल आणि तो दिला तर दुसऱ्या अर्थाने ब्रिटिशांचा भारताच्या विरोधातला पराभव ठरेल आणि स्वातंत्र्य लवकर मिळायला मदत होईल. केवढा मोठा प्लॅन आहे हा !

तीन लाख रुपये पदरचे खर्च करून हा माणूस इंग्लंडमध्ये गेला. तीन लाख रुपये. १९१८-१९ सालातली गोष्ट सांगतो. १६ साली त्याला पत्र पाठवलं होतं आणि त्याच्यावर १९१६ सालामध्ये तिथं खटला दाखल केला होता लंडनमध्ये. आणि १८-१९ साली जाऊन स्वतः तिथे म्हणणं मांडलं. ते स्वतः कायदेपंडितच होते. तिथल्या ज्युरींना त्यांचं म्हणणं पटत होतं. कारण कोणत्याही प्रकारचा प्रतिवाद त्यांना करता येत नव्हता. ते जे म्हणणं मांडत होते की, माझा कुठला लेख यांनी दाखववा की मी त्यात काय लिहिलंय ब्रिटिशांविरुद्ध? मी तर कौतुकच केलंय. ब्रिटिशांचे कायदे त्यात लिहिलेत. मी माझ्या मनाचं काय लिहिलंय? हे त्यांना ब्रिटिशांना इंग्लंडमध्ये जाऊन सांगत होते. आणि ब्रिटिश ज्युरींना ते मान्य होत होतं. फक्त दुर्दैवाने पहिलं महायुद्ध थांबल्यामुळे ब्रिटिशांना या केसची गरज नव्हती आणि म्हणून ठरवून ज्युरींनी त्यांच्या विरोधात निकाल दिला आणि टिळकमहाराज हे केस हरले. ते केस हरले आणि परत आले. लोकांनी त्यांना विचारलं की हे कसं झालं? मग त्यांनी हे सगळं लिहून काढलं की हे या कारणासाठी केलं होतं. त्याचा झालेला खर्च त्या वेळेच्या दैनिक केसरीमध्ये प्रसिद्ध केला. लोकांनी पैसे जमा केले आणि दोन लाख ९० हजार रुपयांची थैली टिळकांना दिली. या तीन लाखांच्या खर्चापोटी देशभरातल्या लोकांनी पैसे दिले. ते म्हणाले हे पैसे मी तुमच्याकडून मिळणार म्हणून मी खटला लढलो नव्हतो. माझ्या देशासाठी हा खटला मी लढलोय. त्यामुळे याचा खर्च मी करणार. हे पैसे विश्वस्त संस्था म्हणून या संस्थेच्या ताब्यात देतो. समाजासाठी काय उपयोग करायचा आहे तो संस्थेने ठरवावा. स्वतः सुद्धा ते संस्थेवर राहिले नव्हते. इतका निःस्पृह माणूस भारताच्या स्वातंत्र्य इतिहासामध्ये सापडत नाही. तो पदरमोडही करतो, शारीरिक श्रमही स्वतः झेलतो, कारावास भोगतो. कारागृहात त्यांना टाकलं हे त्यांच्या बायकोला कळल्यावर ती म्हणाली, देशासाठी तर गेले. सत्यभामाबाईंचे संपूर्ण टिळक चरित्रात एकच प्रसिद्ध वाक्य आहे. ते म्हणजे, ''हो का? ठीक आहे. देशासाठी गेले. भोगावे लागणारच!'' एका वाक्यात प्रतिक्रिया देऊन त्या बाईने संसार चालवला.

त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा खटला झाला त्या वेळी टिळकांच्या घराची झडती घेतली. त्याच्यामध्ये एक बॉम्ब तयार करण्याचं पत्र सापडलं. पत्र म्हणजे ते एक चार तुकडे होते ते एकमेकांना जोडले होते. सिंहगडाच्या घरावर झडती झाली, गायकवाड वाड्यात झडती झाली, त्यांच्या चार नातेवाइकांच्या घरी झडती झाली. कुठेही काहीही सापडलं नाही आणि ते एक पत्र सापडलं ड्रॉवरमध्ये. त्या पत्रात असे लिहिले होते की बॉम्ब कसा बनवायचा आणि त्या पत्राचा आधार घेऊन त्यांना देशद्रोहाच्या खटल्यावरती तुरुंगवास झाला. सहा वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा झाली. टिळकांचा प्रतिवाद असा होता की अहो जर मी बॉम्बवरती लेख लिहितोय, अग्रलेख लिहितोय, तर बॉम्ब कसा बनवायचा हे जर मला कळलं नाही तर मी बॉम्ब बनवल्यानंतर होणारे दुष्परिणाम लोकांना कसे सांगणार आणि हे बॉम्ब बनवण्याच टेक्निक हे इंग्रजांच्या पुस्तकातलं आहे. हे मी निर्माण केलेलं नाही. त्यामुळे तुम्हीच शिकवताय लोकांना बॉम्ब कसा बनवायचा! तोच हा कागद आहे, त्याच्यामुळे मला शिक्षा देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. २२ तासांचा प्रतिवाद केलाय टिळकांनी, इंग्रजांच्या विरोधामध्ये, ज्युरींच्या विरोधामध्ये, पण सहा ज्युरी बिटिश, आणि तीन ज्युरीतले दोन पर्शियान आणि एक मुसलमान. निकाल काय लागणार! कारण ब्रिटिशांना कळलेलंच होतं की ह्या माणसाला देशाबाहेर पाठवलं तरच भारताच्या स्वातंत्र्याची मागणी ही मान्य करावी लागणार नाही. त्याच्यामुळे बाहेर पाठवायचा हे ठरवून दिलेलं निकाल!

डेक्कन कॉलेजमध्ये असताना त्यांनी 'ओरायन' हा एक पेपर परदेशी प्रसिद्ध करायला पाठवला होता. मित्राने आणि आगरकरांनी आग्रह केला. मग त्यांनी ओरायन या पुस्तकाचा अभ्यास केला आणि एक पेपर पाठवला. तो पेपर युरोपमध्ये प्रसिद्ध झाला. त्याचं प्रचंड मोठं कौतुक झालं त्या कौतुकानंतर त्यांच्या प्रशस्तीची पत्रं त्यांना आली.

आणि मग असं लक्षात आलं, अरे हा ग्रंथाचा विषय आहे. हा नुसता दोन चार पेपर लिहून संपणारा विषय नाही. मग सिंहगडावर गेल्यावर 'ओरायन' म्हणजे काय, 'ओरायन' म्हणजे मृगशीर्ष, इंग्लिश-युरोपियन देशांमध्ये 'ओरायन' या शब्दाचा अर्थ मृगनक्षत्र असा होतो (सुदैवाने आजही दिवसाचे नक्षत्र मृगशीर्ष आहे). इथे मृगशीर्ष नक्षत्र जे आहे या नक्षत्रावरून काय आणि कसं केव्हा काय होतं याचा अभ्यास कधी केला नव्हता. महाभारताचा अभ्यास केला नव्हता. १४ ग्रंथांचा अभ्यास करून त्यांनी असा ग्रंथ लिहिला, ज्याच्यामध्ये असं निश्चित सांगता येतं की, महाभारतात कृष्णांनी उल्लेख केला की, महिन्यातला सर्वोत्तम महिना कोणता तर मार्गशीर्ष, ऋतूतला सर्वोत्तम ऋतू कोणता तर वसंत ऋतू, मग मार्गशीर्ष आणि वसंत ऋतू हे एकत्र कधीच येत नाही. कारण, गुढीपाडव्याला अश्विनी नक्षत्र असतं. मग मार्गशीर्षातल्या प्रतिपदेला मृगशीर्ष हे कसं काय? मग असा उलटा विचार करून, पृथ्वी २३ अंशामध्ये कललेली आहे. ती फिरताना आइस्क्रीमच्या कोनासारखी फिरते आणि ती फिरल्यानंतर दोन बिंदूंना एकमेकांपासून जायला वेळ किती लागणार आहे. त्यांच्यामध्ये अंतर किती पडणार. त्यांच्यामुळे दर ७६ वर्षांनी अश्विनीच्या ऐवजी मृग नक्षत्राला पहिला दिवस येणार, असा उलटा अभ्यास करून 'ओरायन'चे लिखाण केलेले आहे. म्हणजे एखाद्या गोष्टीचा अभ्यास करताना काय विचार करायचा आणि तो विचार पटल्यानंतर त्याला पुष्टी देणारी तर्कशुद्ध मांडणी कशी करायची हे लेखक टिळक म्हणून आपल्यासमोर येतं. तेच गीतारहस्यामध्ये! गीतारहस्य काय सांगत? 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' तुम्ही फळाची अपेक्षा न करता कर्म करा. आपल्याला हेच शिकवलं आहे! टिळक असं म्हणतात, त्याचा अर्थच असा नाही. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' या श्लोकाचा अर्थ असा आहे कर्म करण्याचा अधिकार तुझा आहे, फळ काय मिळणार याचा अधिकार तुझा नाही. श्लोक तोच आहे. एक पारंपरिक ज्ञान आहे आणि एक टिळकांची मतप्रणाली आहे. टिळक असं म्हणतात, 'कर्म करायचा अधिकार तुझा आहे. फळ काय मिळेल याचा अधिकार तुझा नाही. कर्म केलं की त्याचं फळ मिळणार आहे. ते काय मिळणार ते जगन्नियंत्याच्या हाती आणि हे सर्व करत असताना माणूस हा कर्मानेच काम करणार आहे. आपण जे बोलतो आहे हेसुद्धा कर्म आहे. तुम्ही इथे बसलाय, ऐकत आहात हेसुद्धा कर्मच आहे. याचं फळ काय मिळणार हे तुमच्या आमच्या हातामध्ये नाही परंतु हा जो 'परंतु' आहे हे गीतारहस्याचं सार आहे. परंतु असं आहे हे सगळं करत असताना धर्म काय सांगतो आणि गीता काय सांगते? जे जे माणसाच्या, प्राणिमात्रांच्या भल्याचं आहे तो माझा धर्म आहे, ते माझं कर्म आहे! पण टिळक असं त्याला जोडतात हे सर्व करत असताना त्याच्यामध्ये धर्माभिमान, देशाभिमान या दोन गोष्टी जर असतील तरच मी करतो त्याला महत्त्व आहे. त्यामुळे माझ्या हातून होणारे प्रत्येक कर्म हे माझ्या देशाभिमानाशी, राष्ट्राभिमानाशी, माझ्या देशाच्या पारंपरिक ज्ञानाच्या अभिमानाशी आणि धर्माभिमानाशी जोडलं गेलं असलं पाहिजे. तरच त्याचा उपयोग आहे, हे गीतारहस्याचं सार त्यांनी त्या रहस्यामध्ये उलगडले आहे.

मॅक्समूलरने ऋग्वेदाच्या त्याने केलेल्या अभ्यासाचं पुस्तक टिळकांकडे पाठवलं. त्या वेळी ते दीड वर्षांच्या कारावासात होते. 'सूर्योदयात् प्राक् बहुनि अहनि आस' हा ऋग्वेदातील श्लोक आहे. म्हणजे काय? तर सूर्योदयापूर्वी पुष्कळ अंधाऱ्या रात्री गेल्यानंतर मला सूर्य दिसला. हे ऋग्वेदात लिहिले आहे. टिळक कारागृहात होते. अठरा महिने कारागृहात असलेला माणूस काय करू शकतो? तर त्यांनी या मॅक्समुलरच्या ग्रंथाचा अभ्यास केला. आणि असं लक्षात आलं, ज्या अर्थी अनेक काळरात्री गेल्यावर मला सूर्योदय दिसला म्हणजे ऋग्वेद लिहिलेली जागा ही अशा ठिकाणी असली पाहिजे उत्तर ध्रुवाजवळ की जिथे काही महिने रात्र आहे आणि काही महिने सूर्य उगवतो म्हणजे काही महिन्यांच्या रात्रीनंतर ज्या वेळी सूर्य उगवतो त्या परिसरामध्ये याची रचना झाली असावी अशी तर्कशुद्ध मांडणी केली आणि त्यांनी तो ग्रंथ लिहिला 'आर्टिक होम इन द वेदाज'. वेद कुठे लिहिले गेले तर तिथे लिहिले आहेत. आर्य बाहेरचे नाहीत तर ते तिथून आलेले आहेत असं म्हटलं जातं तरी मूळ तिथलेच होते. त्यामुळे ते आले हा शब्द बरोबर नाही.

विचार करण्याची प्रवृत्ती जर माणसाची सकारात्मक असेल तर माणूस काय करू शकतो? जसं सहा वर्षाच्या कालखंडामध्ये 'गीतारहस्य' लिहिलं तसा दीड वर्षाच्या कालखंडामध्ये 'आर्क्टिक होम इन द वेदाज' लिहिला. 'ओरायन'सारखा ग्रंथ ज्याच्यावर चर्चा करायलासुद्धा आज कोणी तयार नाही, एवढी विद्वत्ता कोणाकडे नाही, या ग्रंथांवरती आजच्या काळातही कोणी चर्चाही करत नाही. त्या काळामध्ये टिळक हे शंकराचार्यांबरोबर काशीला संस्कृतमध्येच वेदांवरती चर्चा करत होते. असा एक अत्यंत योगी संन्यासी प्रवृत्तीचा माणूस होता. त्यांच्या आजोबांनी काशीला जाऊन संन्यास घेतला होता आणि १८७२ साली रामचंद्रपंतांनी काशीमध्ये समाधीपण घेतली.

त्यामुळे काशीला गेल्यानंतर तिथल्या धर्ममार्तंडांशी, शंकराचार्यांशी संस्कृतमध्ये संवाद करून, संस्कृतमध्ये वेदांवरती प्रतिवाद करून आपल्या आणि शंकराचार्यांच्या म्हणण्यातील तफावत काय आहे हे समजून घेऊन, त्याच्याबद्दल चर्चा करून त्याचा उपयोग पुढे कोल्हापूरच्या करवीर पीठ आणि संकेश्वर पीठ असा एक वाद झाला होता, त्या वेळी करून घेतला. करवीर पीठाचे शंकराचार्य कोणते आणि संकेश्वर पीठाचे कोणते या वादामध्ये निर्णय देताना त्यांनी शंकराचार्यांबरोबर केलेल्या वादविवादाचा उपयोग करून करवीर पीठाच्या म्हणजे डॉक्टर कुर्तकोटी म्हणजे ज्यांनी शंकराचार्यांची गादी पुढे चालवली त्यांना सांगितले की तुम्ही दोन्ही पीठं एकत्र करा.

गोंदवल्याचे गोंदवलेकरस्वामी यांच्यासमोर हा वाद झाला. ते सिद्ध पुरुष होते. ते म्हणाले, ''टिळकमहाराज सांगतात ते तुम्ही करा! त्यांनी जे सांगितले ते बरोबर आहे!'' म्हणजे सतपुरुषांचासुद्धा त्यांनी केलेल्या तर्कशुद्ध विवेचनाला पाठिंबा होता.

१९०७-०८च्या सुमारास अकोल्याला शिवजयंतीची सभा होती आणि त्या सभेमध्ये शेगावचे गजाननमहाराज आलेले होते. एकाच व्यासपीठावर होते. समोर १०-१२ हजार लोकं होती. आणि टिळक इतके आवेशपूर्ण भाषण करत होते की टिळकांनी भाषणाच्या ओघात समोरच्या समुदायाला एक प्रश्न विचारला होता की छत्रपतींच्यासाठी आपण हे करणार की नाही...? गजानन महाराज त्या व्यासपीठावर एकदम उभे राहिले आणि म्हणाले की ''हो हो! हे केलंच पाहिजे!'' गजानन विजय ग्रंथामध्ये हा फोटोसहित श्लोक आहे. त्या व्यासपीठावरून टिळकांना गजाननमहाराजांनी सांगितले की तुम्हाला कारावास आहे. सांभाळून राहा. मग १९०८ साली त्यांच्यावर खटला झाला आणि ६ वर्षे तुरुंगवास. द्रष्टे पुरुष एकमेकांना भेटल्यावर एकमेकांची काळजी घेऊन भविष्यात काय होणार आहे हे सांगायचं काम करत असतात. टिळकांनी त्यांचं म्हणणं मांडलं आणि महाराजांनी त्यांना हे उत्तर दिलं की काळजी घ्या! तुम्हाला तुरुंगवास आहे.

टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा कोणताही पैलू असा नाही की जो त्यांनी त्यांच्या कामासाठी आणि स्वातंत्र्यासाठी वापरला नाही. १८८० ते १८९० हे दशक गणित शिकवणं, शालेय शिक्षण, शाळेची स्थापना, कॉलेजची स्थापना... दूरदृष्टीचं एकच उदाहरण तुम्हाला सांगतो म्हणजे तुम्हाला लक्षात येईल.. फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली आणि फर्ग्युसन कॉलेज झालं, डेक्कन एज्युकेशन सोसायटी झाली, आता विस्तार करायचाय.... शाखा वाढवायचीय... वर्ग वाढवायचेत. टिळकांनी व्हॉईसरॉयला पत्र लिहिलं की आम्हाला जागा द्या... शिक्षणासाठी, शाळा काढण्यासाठी, कॉलेज काढण्यासाठी! व्हॉईसरॉयने पत्र दिलं ते आजही डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या रेकॉर्डमध्ये आहे. आज जी पुण्यातील महात्मा फुले मंडई आहे. त्या मंडईची सात एकराची जागा आहे. इथे तुम्हाला जागा देतो. इथे कॉलेज काढ. याला उत्तर म्हणून टिळकांनी एक पत्र लिहिलंय. त्याचा अभ्यास करा! माणसाची बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टी किती आणि कशी असावी किंवा कशी होती त्यांची! व्हॉईसरॉयला पत्र लिहिलंय त्याच्यात ते असं लिहितात की एवढ्याशा जागेने माझं काय होणार? मला किमान ४०० एकर जागा पाहिजे. ते १८९० सालात ४०० एकर जागा मागताहेत!

ही डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा द्यायच्या आधीची गोष्ट आहे आणि ४०० एकरचं अंतर देताना त्यांनी सांगितलं, की आज जिथे फर्ग्युसन महाविद्यालय, भांबुर्ड्यातून ते चतु:शृंगीच्या देवळापर्यंतचा सगळा पट्टा मला द्या, शिक्षण संस्था काढण्यासाठी आणि शिक्षणसंकुल तयार करण्यासाठी, 'संकुल' हा शब्द लोकमान्य वापरला आणि आज हा सगळा परिसर आणि संकुल पाहिल्यानंतर 'व्हिजनरी' कसे असतात ते समजतं. महाराजांचेच व्हिजन किती मोठं आहे हे प्रत्यक्ष चालताबोलता इतिहास आपण समोर बघतोय, प्रचिती घेतोय. मी पण काल प्रचिती घेतली. द्रष्टे पुरुष द्रष्टे असतात ह्याचं कारण त्यांचं व्हिजन मोठंच असतं. आपण त्यांच्या बुद्धिमत्तेचा आवाका समजून घेऊ शकत नाही. म्हणजे ही इमारत बांधा आणि आपण बांधतो; पण त्याचा उपयोग काय करायचा आहे हे द्रष्टे पुरुषालाच नक्की माहिती असतं, तसंच ४०० एकर जागा त्यांनी मागितली त्या काळामध्ये आणि आज जर पाहिलं तर शंभर एकरची जागासुद्धा फर्ग्युसन महाविद्यालयाला कमी पडेल! पुण्याला डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या ज्या शाळा आहेत त्या शाळांएवढी मैदानं पुण्यातल्या कुठल्याच शाळेत नाहीत. म्हणजे, शाळांमध्ये एवढी मैदान असलीच पाहिजेत ही त्या काळात त्यांनी मांडलेली भूमिका. म्हणजे १८८० ते १८९० शिक्षण आणि शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेलं काम, १८९० ते १९०८ ह्या काळामध्ये सामाजिक चळवळीत अग्रलेखात नंतर वर्तमानपत्रांमध्ये इंग्रज सरकारवर केलेली टीका, १९०५-१९०६-१९०७-१९०८ वेगवेगळ्या प्रकारामध्ये काम, १८९७चा राजद्रोहाचा खटला सुरू झाला. याच्यामध्ये तर त्यांच्यावर असा ठपका ठेवला होता की त्यांनी चाफेकरांना फूस दिली. कुठल्याही पत्रांमधून ते सिद्ध होत नव्हतं तरीही त्यांना तुरुंगवास झाला. येरवड्यामध्ये टिळक आणि दामोदर हरी चाफेकर दोघंही एकाच ठिकाणी होते. येरवडा जेलमध्ये दामोदर यांनी त्यांना सांगितलं की तुमची ही गीता मला द्या! टिळकांकडे तीन गीतेची पुस्तकं होती. त्यातला एक त्यांनी दामोदर हरी चाफेकर यांना दिलं. ती छातीशी धरून तो क्रांतिकारक फासावर गेला. ती गीता टिळकांनी परत मागून घेतली, आजही पुण्याच्या लोकमान्य संग्रहालयामध्ये ती गीतेची प्रत आहे, जी दामोदर हरी चाफेकर छातीशी धरून घेऊन फासावर गेले.

म्हणजे आपण काय करतो, त्याचे परिणाम काय होणार आहेत, त्याच्यामुळे ब्रिटिश सरकारला कसा धक्का बसणार आहे हे त्यांना पूर्णपणे माहीत होतं. फक्त सरकारने ठरवलं होतं म्हणून यांना तुरुंगवास! सरकारने ठरवलं होतं म्हणून यांना काळ्या पाण्याची शिक्षा! अन्यथा टिळक त्यांना कधीही सापडले नसते. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जेवढ्या गुणांची आपण चर्चा करतो त्यातल्या सगळ्या गुणांची कोणी यादी केली असेल तर असं लक्षात येईल की या यादीमधील एकेका गुणांनी लोकांनी आपलं आयुष्य उभं करावं. म्हणजे व्यासंगी होते, स्वातंत्र प्रज्ञावान होते, बुद्धिवान होते, द्रष्टे होते. परंपरांचे अभिमानी होते, समाजसुधारक होते, गणितज्ञ होते, शिक्षक-प्राध्यापक होते, कायदेपटू होते, पंचांगकर्ते होते, सांगलीच्या ज्योतिष

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

संमेलनाचे अध्यक्ष होते. ज्योतिष परिषदेमध्ये पंचांग कसं करावं, पंचांगामध्ये काय ग्राह्य धरावं याच्याबद्दलचं विवेचन त्यांनी केलं.

त्या काळी पुण्यामध्ये दोनच पंचांगं अधिकृत मानली जात होती. त्यावर आधारित एक नवीन निरायन पंचांग असावं आणि ते कसं तयार करावं याचं मार्गदर्शन लोकमान्य टिळकांनी केलं. त्याच्यासाठी उज्जैनच्या महांकाळाचा संदर्भ दिला आहे. उज्जैनला आज आपण जे महाकाळाचे मंदिर पाहतो त्या महांकाळाला महांकाळच का म्हणतात तर त्या वेळी हिंदुस्थानचा आकार एवढा मोठा होता अखंड हिंदुस्थान की उज्जैनच्या महांकाळात स्थापना आहे, त्या तिथून शून्य अक्षांश जात होते पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे असे १८० अंश देशांची अंशात्मक गणना केली जात होती. इंग्रजांचे सरकार आल्यानंतर ग्रीनविचला परिषद झाली. त्या वेळी इंग्रजांनी तो महांकाळाचा ० अक्षांशाचा बिंदू हा ग्रीनविचला हलवला म्हणून आज आपण ग्रीनविचच्यापासून १८० एकीकडे आणि १८० दुसरीकडे अशी पंचांग खगोलियन रचना पाहतो. तो महांकाळ आहे, काळाचं मापन तिथून होतंय म्हणून तो महांकाळ म्हणून तो शून्य अक्षांश आहे, अशा पद्धतीचीही आपल्याकडे त्याची माहिती अधिकृत उपलब्ध आहे. टिळकांनी त्याचे संदर्भ घेऊन निरयन पंचांग कसं करावं हे सांगितलं आणि त्याप्रमाणे ते तयार करून घेतलं, ते टिळक पंचांग आपण सगळे जण पाहतो.

शिवजयंती आणि गणेशोत्सवामध्ये लोकांचे एकत्रिकरण किंवा समाजाचं संघटन! गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव हा एकच उत्सव असा होता की ज्याच्यामध्ये घोषणा देत होते एरवी कोणत्याही ठिकाणी रस्त्यावर घोषणा द्यायला इंग्रज सरकारने बंदी घातली होती. शेवटी मंडालेच्या तुरुंगातून सुटल्यावर गणेशोत्सवामध्ये गणपती सोडून कोणावरही घोषणा द्यायची नाही असं पत्रक इंग्रजांनी काढलं, पुणेकरांनी त्यावर उत्तर दिलं होतं, टिळकांच्या गणपतीचा विजय असो! गणपती टिळकांच्या गणपतीचा विजय असो! अशा घोषणा पुण्यात पुण्यातल्या रस्तोरस्ती दिल्या. इंग्रज त्यांना काहीही करू शकले नाहीत, कारण टिळकांचा गणपती म्हटलेले गणपतीचीच घोषणा दिली आहे. टिळकांचे नाव आले त्यात कारण तो गणपती टिळकांचा आहे. म्हणजे आता हे कोणी सुचवलं असेल तुम्हाला मी वेगळं सांगायला नको. ब्रिटिशांनी केलेल्या प्रत्येक वाराला प्रतिवार कसा करायचा आणि त्यांचाच डाव कसा त्यांच्यावर उलटवायचा याचं जे तंत्र टिळकांना अवगत होतं, तेच तंत्र स्वराज्याच्या कामी त्यांनी १०० टक्के अत्यंत नि:स्पृहपणे वापरलं म्हणून आज १०४ वर्षे झाली तरी त्यांच्या पुण्यतिथीला त्यांची आठवण काढतो.

साक्षात उभे तेज हे प्रखर शौर्याचे । जगण्यास आज ते प्रतीक आदर्शांचे ।। हा जन्म दिला ज्या मातेने सूर्याला । राहील ऋण या धरणीवर मातेचे । साक्षात उभे हे तेज प्रखर शौर्याचे ।।१।।
हे जीवन म्हणजे जळते अग्नीकुंड । ते अचाट साहस शौर्य असे आडदांड ।। अवतारच ठरली होती वामन मूर्ती । जे पाहुनी गेले वाकून अशोक झाड ।। हे जीवन म्हणजे जळते अग्नीकुंड ।।२।।
ते सिंधू सागर होते स्फुल्लिगांचे । ते वीर अति सेनानी रणांगणाचे । अवद्य होते अजिंक्य शक्तिशाली । ते वारस होते खरेच शिवरायांचे । ते सिंधू सागर होते स्फुल्लिगांचे ।।३।। जो गाई त्यांचे गाणे होई महान। मृत्यूही करितो त्रिवार तव वंदन ।। का जावे आम्ही आज कुण्या राऊळी । तव चरित्र आम्हा मंगल देवस्थान ।। ४।।
धन्यवाद!''

श्री. ओम्कार तांबे यांनी आभार प्रदर्शित केल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.



**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५, सहसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035